www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले | उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड | कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे | निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील | सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 346 | रविवार दि. 31 ऑगस्ट २०२५ | किंमत : ४ रु | पृष्ठ : 6 | RNI MAHMAR/2023/89514

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी घेतले वर्षा निवासस्थानी गणरायाचे दर्शन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून सहकुटुंब शाह दाम्पत्याचे स्वागत

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,संतोष पाटील**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सपत्निक भेट देवून श्री गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी श्री. शाह यांचे गणेश मूर्ती शाल, श्रीफळ तसेच पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री अड. आशिष शेलार, पणन आणि राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार रवींद्र चव्हाण, अमित साटम, मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या मातोश्री सरिताताई फडणवीस, पत्नी अमृता फडणवीस, कन्या दिविजा फडणवीस तसेच इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



# राष्ट्रीय क्रीडा दिन थेपडे विद्यालय म्हसावद येथे जल्लोषात साजरा

**दैनिक युवक आधार**
**जळगांव जिल्हा पप्रतिनिधी समाधान पाटील**

29 ऑगस्ट 2025 हा दिवस हॉकीच्या महान खेळाडू ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. ध्यानचंद हे भारतीय हॉकीचे महानायक म्हणून ओळखले जातात आणि त्यांचे योगदान भारतीय क्रीडा क्षेत्राला अमूल्य आहे. त्यांच्या सन्मानार्थ हा दिवस *राष्ट्रीय क्रीडा दिन* म्हणून साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर स्वा. सै. पं. ध. थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय म्हसावद ता जि जळगाव या विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिवस साजरा करण्यात आला. प्रथमता हॉकीचे महानायक ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री पी डी चौधरी सर , उप मुख्याध्यापक जी डी बच्छाव सर, पर्यवेक्षक के पी पाटील सर, शिक्षक प्रतिनिधी सचिन चव्हाण सर व विद्यार्थ्यांचे पालक समाधान वाघ यांनी केले.




याप्रसंगी ज्येष्ठ शिक्षिका सौ एच डी हूजरे, श्री एस एम नेतकर सर, श्री एस सी बाविस्कर सर व श्री एन के अहिरे सर व खेळ शिक्षक प्रमुख पी ए महाजन सर गिरासे सर उपस्थित होते. त्यानंतर कबड्डी या खेळाचे दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळ प्रदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक बंधू-भगिनींनी सहकार्य केले.

# पर्यटनामुळे रोजगार निर्मिती त्यामुळे स्थलांतर रोखण्यात यश. सुनील तटकरे

दैनिक युवक आधार
श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी :- अनिकेत मोहित

श्रीवर्धन तालुक्यात विकास कामांना चालना दिल्याने पर्यटनात अमुलाग्र स्वरूपाचा बदल झालेला आहे. पर्यटनातून होणाऱ्या रोजगार निर्मितीमुळे स्थलांतर रोखण्यात यश प्राप्त होत आहे असे प्रतिपादन सुनील तटकरे यांनी केले आहे. वडवली येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या लोकार्पणप्रसंगी खासदार सुनील तटकरे यांनी नागरिकांशी संवाद साधला . सुनील तटकरे म्हणाले श्रीवर्धन मतदार संघात पर्यटन व्यवसायाला मोठ्या स्वरूपात चालना मिळाली आहे . आगामी काळात स्थलांतरित नागरिक पुन्हा गावाकडे येतील व स्थानिक पातळीवर रोजगाराची संधी मोठ्या प्रमाणात असेल याचा मला विश्वास आहे. गाव विकासाच्या दृष्टिकोनातून वेळोवेळी स्थानिक नेतृत्वाने मागणी केलेला निधी प्रत्येक वेळी उपलब्ध करून दिलेला आहे. वडवली पंचक्रोशीतील नागरिकांनी लोकसभा व विधानसभा प्रसंगी भरघोस मताचे दान मला व माझ्या लेकीला दिलं याबद्दल मी समाधानी आहे. ग्रामपंचायत कार्यालयासाठी ५० लाख रुपयांचा निधी दिला व आज ग्रामपंचायत कार्यालयाचे लोकार्पण होत आहे याचा खऱ्या अर्थाने आनंद आहे. सदर कार्यक्रम प्रसंगी महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी मनोगत व्यक्त करताना



सांगितले की श्रीवर्धन मतदारसंघात पहिल्या पाच गावांमध्ये वडवली गावाला मोठ्या स्वरूपात निधी देण्यात आलेला आहे . वडवली गाव खासदार साहेबांनी दत्तक घेतलेले आहे. अनिकेतभाई व माझ्यापेक्षा साहेबांचं वडवली गावावरती जास्त प्रेम आहे . सदर लोकार्पण सोहळ्याचे प्रस्ताविक संतोष भायदे यांनी केले . सदर कार्यक्रमासाठी प्रांताधिकारी महेश पाटील , उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी मोहम्मद मेमन , नंदू पाटील , सचिन किर, मंदार तोडणकर, विविध समाज मंडळाचे अध्यक्ष श्याम धुमाळ , रवींद्र मांजरेकर, अजीम जंजीरकर, संतोष भायदे , पांड्या मामा खेऊर, रिजवान वेळासकर व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा समाजासाठी गठीत वंशावळ समितीस 30 जून 2026 पर्यंत मुदतवाढ

दैनिक युवक आधार
मुंबई,संतोष पाटील

राज्यातील मराठा समाजातील पात्र व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जातीचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तालुकास्तरावर तहसिलदारांच्या अध्यक्षतेखाली गठीत वंशावळ समितीस शासनाने दि. 30 जून 2026 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित केला असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या 25 जानेवारी 2024 रोजीच्या शासन निर्णयान्वये ही समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या कार्यकाळाला यापूर्वी 30 जून 2025 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर, न्यायमूर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीचा कार्यकाळ 31 डिसेंबर 2025 पर्यंत वाढविण्यात आला होता. यास अनुसरून तालुकास्तरीय वंशावळ समितीस उच्चस्तरीय समितीच्या मुदतवाढीपेक्षा किमान सहा महिने अधिक मुदत देण्याचा विचार शासनाकडून करण्यात आला होता. त्यानुसार, आता या समितीचा कार्यकाळ 30 जून 2026 पर्यंत वाढविण्यात आला आहे. समितीस 25 जानेवारी 2024 रोजीच्या शासन निर्णयातील सर्व तरतूदी लागू राहतील, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.


# रस्त्यावरील अर्धवट दिसणाऱ्या केबलच्या वायरी केव्हा काढणार

दैनिक युवक आधार
मुंबई प्रविणभाऊ पवार

मुंबईच्या बहुप्रतिक्षित सांताक्रूझ-चेंबूर लिंक रोड एम.सी. एल.आर विस्तार दक्षिण आशियातील पहिली वक्र केबल स्टेयड पुल या नव्यानी बांधण्यात आलेला दि १४ ऑगस्ट २०२५ रोजी वाहतूकीसाठी खुला करण्यात आला.

परंतु त्या खाली वेस्टन नॅशनल हायवे रोड शेजारी पटेल नगर, एअर फोर्स गेट शेजारी, चिपळूण सहकारी पतपेढी समोरील सर्विस रोडवरून हायवे वर जाण्यासाठी एक तात्पुरती छोटासा मार्ग आहे. या मार्गावरील साफसफाई करण्या प्रसंगी केबलच्या अनेक अर्धवट वायरी टोके बाहेर काढलेल्या दिसत आहेत.

याच फूटपाथ वरुन रोज अनेक दोन व चार चाकी वाहने येथून सतत जात असतात. त्याच बरोबर येथील मार्गावरील रस्ता पण खुप खराब आहे. रस्त्याच्या दगडी निघून खड्डे पडले आहेत. या मध्ये पावसाचे पण साचलेले आहेत. या केबलच्या वायरीमुळे मोठा धोका होण्याचा संभव आहे. तेव्हा संबंधित अधिकार लक्ष देऊन या अर्ध डिशनरी वायरी काढून टाकावे व रस्ता दुरुस्त करून हा मार्ग मोकळा करावा.



गणेशोत्सवानिमित्त पनवेल शहर पोलीस ठाणे येथे श्री गणरायाचे लोकप्रिय आ. प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, माजी नगरसेविका नीता माळी, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, उमेश इनामदार आदी उपस्थित होते.

(दैनिक युवक आधार)

# भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू यांना जीवे मारण्याची जाहीर धमकी

## शेकापच्या राजेंद्र पाटील यांच्यावर पोलिसांनी कायदेशीर कारवाई करण्याची मागणी

सैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी)

नेहमीच दादागिरीची भाषा करून अनेक जणांना धमकी देणाऱ्या शेकापच्या राजेंद्र पाटील यांच्या विरोधात भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू यांनी आज (शनिवारी) पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे. नुकताच शेतकरी कामगार पक्षाचा पदाधिकारी नियुक्ती पत्र वाटप कार्यक्रम पनवेलमध्ये झाला. या कार्यक्रमात राजेंद्र पाटील यांनी शेकापच्या व्यासपीठावरून आणि आपल्या भाषणातून गणेश कडू यांना जीवे मारण्याची जाहीर धमकी दिली. राजेंद्र पाटील यांनी केलेल्या या गंभीर वक्तव्यामुळे गणेश कडू यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे आपल्या जीवितास झालेल्या धोक्यामुळे गणेश कडू यांनी अखेर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या संदर्भात त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांना त्यांनी निवेदन दिले आहे. यावेळी त्यांच्यासोबत आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य जीवन म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य जगदीश पवार, माजी नगरसेवक सुनिल बहिरा, करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, संतोष पाटील, माजी नगरसेवक नीता माळी आदी उपस्थित होते.

शेकापच्या कार्यक्रमात राजेंद्र पाटील यांनी बेताल वक्तव्य करत खालच्या भाषेत टीका केली होती आणि त्यामध्ये गणेश कडू यांना टार्गेट करत अक्षरश मारण्याची धमकी उघडपणे दिली. या संदर्भात गणेश कडू यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्याकडे कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. गणेश कडू यांनी दिलेल्या निवेदनात सांगितले कि, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे व माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली मी दोन महिन्यापुर्वी शेतकरी कामगार पक्ष सोडून भारतीय जनता पार्टी मध्ये प्रवेश केलेला आहे. त्यामुळे शेतकरी कामगार पक्षातील काही लोक माझ्या विरुद्ध राग ठेवुन आहेत. दिनांक २४ ऑगस्ट रोजी पनवेलमध्ये एका कार्यक्रमात राजेंद्र महादेव पाटील (रा. वहाळ) याने सार्वजनिक भाषण करतांना माझा नाम उल्लेख करत थेट मारण्याची धमकी दिली. "गणेश कडू दात दाखवत होता, "या निमीत्ताने मी गणेश कडू ला सांगु इच्छीतो. तुझे दात घशात घालण्याइतकी



ताकद माझ्या मनगटात आहे. तुला शेवटचा आणि पहिला अंतिम शब्द, परत जर तू दात दाखवलेस तर तुला तिथे येऊन फटकावेल, तुला सोडणार नाही." अशा गुंडगिरी शब्दात मारण्याची धमकी राजेंद्र पाटील याने मला दिलेली आहे. राजेंद्र पाटील हा गुंड प्रवृत्तीचा व्यक्ती आहे, त्याच्याकडून माझ्या जिवीतास धोका आहे. तो मला ठार मारण्याचा प्रयत्न करु शकतो आणि ही बाब राजेंद्र पाटील याने केलेल्या भाषणावरुन स्पष्ट होत आहे. त्यामुळे नम्र विनंती आहे की, राजेंद्र महादेव पाटील रा. वहाळ, ता. पनवेल याचे विरुद्ध मला जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याबाबत कायदेशिर कारवाई करण्यात यावी, असे गणेश कडू यांनी निवेदनात अधोरेखित केले आहे. राजेंद्र पाटील हे सतत धमकी देण्याच्या विधानाने आणि गुन्ह्याने चर्चेत असतात अशातच गणेश कडू यांना दिलेली जाहीर धमकी गुंड प्रवृत्तीची असल्याने त्यावर कारवाई करण्याची जोरदार मागणी झाली आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन आता पुढे कोणती कार्यवाही करते याकडे सर्वसामान्य माणसाचेही लक्ष लागले आहे.

> गणेश कडू यांनी माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे व प्रीतम म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली भाजपात प्रवेश केला. पनवेल तालुक्यातील जनता गणेश कडू हे प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने व कष्टाने काम करणारे व्यक्तिमत्व म्हणून ओळखतात. शेकापच्या कार्यक्रमात त्यांच्या पुढाऱ्यांच्या उपस्थितीत गणेश कडू यांना जीवनातून संपवण्याचा विधान राजेंद्र पाटील यांनी केला तो प्रकार निषेधार्थ आहे. असा प्रकारचे विधाने करणे हा राजेंद्र पाटील यांचा स्वभाव आहे. राजेंद्र पाटील यांच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे आहेत. धमकावण्याची भाषा त्यांच्याकडून होते. ती भाषा कुठल्याही कार्यकर्त्याला संताप आणणारी आहे. आणि त्याचा पोलिसांनी बंदोबस्त करावा अशी आमची पोलिसांना विनंती आहे. आणि पोलीस यामध्ये यशस्वी झाले नाहीत तर नाईलाजाने आम्हाला तोच कायदा हातामध्ये घ्यावा लागेल. याकडे पोलिसांनी लक्ष दयावे आणि हि वळवळणारी तोंडे आहेत ती योग्य पद्धतीने बंद करावीत, शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्यांना सुद्धा या पद्धतीची भाषा त्यांच्या व्यासपीठावर बोललेली आवडत असेल तर उद्या हे अस्त्र त्यांच्यावर सुद्धा असेच उलटू शकतो याची जाणीव त्यांनी ठेवावी. त्यामुळे राजेंद्र पाटील यांच्यावर आवर घाला. स्टंटबाजी करणे हा त्यांचा स्वभाव आहे.अनेक जण त्याच्यावर नाराजी व्यक्त करतात फक्त ते दबल्या तोंडाने बोलतात. आता आमच्या विरोधात बोलला तर आम्हाला तसेच उत्तर दयावे लागेल. राजेंद्र पाटील यांच्यावर कारवाई करताना त्यांच्यावर असलेले आधीचे गुन्हेही पोलिसांनी लक्षात घ्यावेत. - आमदार प्रशांत ठाकूर



# पिंपळगाव बसवंत क. का. वाघ. महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर संपन्न

## मैदानी खेळ तंदुरुस्त व निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख यांचे प्रतिपादन

**दैनिक: युवक आधार**
**प्रतिनिधी /कृष्णा गायकवाड**

पिंपळगाव बसवंत कर्मवीर काकासाहेब वाघ पिंपळगाव बसवंत महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिर संपन्न याबाबत प्राध्यापक क्रीडाधिकारी श्री हेमंत पाटील सर यांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार. क्रीडा हा केवळ मनोरंजनाचा किंवा वेळ घालवण्याचा भाग नाही. क्रीडेमुळे शरीर तंदुरुस्त राहते, शिस्त, संयम, सहकार्य, परिश्रमशीलता या गुणांचा विकास होतो. सध्याच्या तणावग्रस्त जीवनशैलीत खेळ ही मानसिक आरोग्य टिकवण्यासाठी महत्त्वाचे आहे. क्रीडा क्षेत्रातून आज अनेकांना करिअरच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. मैदानी खेळ हे तंदुरुस्त व निरोगी जीवनाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन पिंपळगाव बसवंतचे पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख यांनी केले. मविप्र समाज संस्थेच्या पिंपळगाव बसवंत येथील कर्मवीर काकासाहेब वाघ महाविद्यालयात मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित भव्य रक्तदान शिबिरामध्ये ते बोलत होते. याप्रसंगी मविप्र उपाध्यक्ष विश्वास मोरे, स्थानिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रा.रवींद्र मोरे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. (डॉ.) सुरेश जाधव, उपप्राचार्य प्रा. दिलीप माळोदे, सकाळ सत्र प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर सातभाई, डॉ. एस. के. मोरे, प्रा. भगवान कडलग, क्रीडाधिकारी प्रा. हेमंत पाटील, प्रा. सागर कडलग, प्रा. संपत खैरनार, मविप्र वैद्यकीय महाविद्यालय रक्तपेढी रक्त संक्रमण अधिकारी डॉ. पूजा इप्पर, गजानन पवार, नेहा मोगल, अंकिता मोगल, नितीन गायकवाड, रोशन हांडगे, शकुंतला निकम, शिवा गवांदे आणि त्यांच्या टीममधील सर्व सहकारी आदी उपस्थित होते. मनोगत व्यक्त करताना मविप्र उपाध्यक्ष विश्वास मोरे म्हणाले आज रक्तदानाचे महत्त्व अधिक आहे. नियमित स्वरुपात रक्तदान केल्यास शरीरातील अतिरिक्त लोह नियंत्रणात राहण्यास मदत होते म्हणून जास्तीत- जास्त विद्यार्थ्यांनी रक्तदानात सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रा. रवींद्र मोरे म्हणाले की, आजच्या तरुण पिढीने मोबाईल आणि डिजिटल साधनांमध्ये वेळ घालवण्याऐवजी मैदानी खेळांकडे वळावे. निरोगी आहार बरोबरच आपण नियमित रक्तदान देखील केले पाहिजे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. एखाद्या व्यक्तीला जीवनदान देण्याच्या दृष्टीने रक्ताची नितांत गरज जेव्हा भासते तेव्हा त्या व्यक्तीच्या दृष्टीने रक्तदान केलेली व्यक्ती ही त्याच्या जीवनातील श्रेष्ठ व्यक्ती म्हणून तो तिच्याकडे पाहतो त्यामुळे रक्तदान हे अत्यंत महत्त्वाचे असते असे विचार त्यांनी व्यक्त केले.

याप्रसंगी जम्मू आणि काश्मीर येथे पार पडलेल्या खेलो इंडिया जलक्रीडा महोत्सवात सहभागी झालेले साद पटेल, उत्तम पवार, दर्शन मोरे, अनुष्का आंबेकर, प्रतीक्षा जाधव, नेहा घुते, व आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू वेदांत राऊत, प्रविण चव्हाण यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थी, खेळाडू, प्राध्यापक व सेवक यांच्यावतीने एकूण २६ पिशव्या रक्त संकलित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. (डॉ.) सुरेश जाधव यांनी मैदानी खेळ - रक्तदान यांचे जीवनातील महत्त्व विशद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडाधिकारी प्रा. हेमंत पाटील व आभार प्रा.सागर कडलग यांनी मानले. या रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने प्राध्यापक, विद्यार्थी व सेवकांनी सहभाग नोंदविला.




१) क. का. वाघ पिंपळगाव बसवंत महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त बोलताना पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख, उपाध्यक्ष विश्वास मोरे, प्रा.रवींद्र मोरे, प्राचार्य प्रोफे. (डॉ.) सुरेश जाधव, उपप्राचार्य प्रा. दिलीप माळोदे, प्रा. हेमंत पाटील, प्रा. सागर कडलग, डॉ. पूजा इप्पर, गजानन पवार, नेहा मोगल, अंकिता मोगल, नितीन गायकवाड, रोशन हांडगे, शकुंतला निकम, शिवा गवांदे आदी.

२) क. का. वाघ पिंपळगाव बसवंत महाविद्यालयात रक्तदान करताना विद्यार्थी व प्राध्यापकांसोबत पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख, उपाध्यक्ष विश्वास मोरे, प्रा.रवींद्र मोरे, प्राचार्य प्रोफे. (डॉ.) सुरेश जाधव, उपप्राचार्य प्रा. दिलीप माळोदे, प्रा.हेमंत पाटील, प्रा. सागर कडलग, डॉ. पूजा इप्पर, गजानन पवार, नेहा मोगल, अंकिता मोगल, नितीन गायकवाड, रोशन हांडगे, शकुंतला निकम, शिवा गवांदे आदी उपस्थित होते.

## रिसोड कृ. उ. बा. समितीकडून मा. आ. वामनरावजी चटप यांचा सत्कार संपन्न

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी. सिंह ठाकुर**

शेतकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते तथा वेगळ्या विदर्भासाठी सातत्याने लढा देणारे माजी आमदार मा. वामनरावजी चटप साहेब यांनी काल रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीला भेट दिली. यावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मा. विष्णुपंत भुतेकर यांच्यासोबत त्यांची शेतकऱ्यांची पीक कर्जमाफी, शेतकरी आत्महत्या, सोयाबीनचे पडलेले भाव आणि अतिवृष्टी तथा वेगळ्या विदर्भासाठी जन आंदोलन उभे करणे या विषयावर प्रदीर्घ चर्चा झाली. या सर्व विषयावर विदर्भात जन आंदोलन उभे करण्यासाठी दोन्ही नेत्यांमध्ये एकमत झाले असून यानंतर शेतकऱ्यांचा हा लढा संयुक्तपणे लढण्याचे ठरले. भूमिपुत्र शेतकरी संघटना शेतकऱ्यांच्या प्रत्येक प्रश्नावर वामनरावजी चटपसाहेब यांच्या सोबत राहणार असल्याचे यावेळी विष्णुपंत भुतेकर यांनी सांगितले.


यावेळी रिसोड कृषी उत्पन्न बाजार समिती तथा भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून माजी आमदार वामनरावजी चटक तथा त्यांच्यासोबत असलेले राजू अवताडे वाशिम जिल्हा अध्यक्ष, डॉ. रमेश चंदनशिव, ओमप्रकाश तापडिया, कृष्णाजी घोंगाडे यवतमाळ जिल्हाध्यक्ष, मधुसूदन कोवे यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष, सर्व सहकाऱ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी रवींद्र चोपडे, भाऊराव पाटील गरड, विकास झुंबरे, सचिव विजय देशमुख, विनोद गिरे, सुधाकर बोडखे सह भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते तथा रिसोड कृषी उत्पन्न बाजार समितीचे कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सार्वजनिक गणेशोत्सवाची खरी भूमिका ऐक्याचा उत्सव की गट-तटांचा रणांगण?

**आसाराम विरकर**
**संपादक, दैनिक युवक आधार (मराठवाडा आवृत्ती)**

गणपती बाप्पा म्हणजे विघ्नहर्ता, मंगलमूर्ती. भारताच्या सांस्कृतिक परंपरेत गणेशोत्सवाला अनन्यसाधारण स्थान आहे. पण सार्वजनिक गणेशोत्सवाचे महत्त्व केवळ धार्मिक मर्यादेत मर्यादित नाही. लोकमान्य टिळकांनी जेव्हा गणेशोत्सव सार्वजनिक स्वरूपात सुरू केला, तेव्हा त्यामागे स्पष्ट सामाजिक भूमिका होती – गावोगावच्या, वस्तीवस्तीतील सर्व घटकांना एकत्र आणणे, कटुता विसरून ऐक्य निर्माण करणे आणि सामाजिक जागृतीला चालना देणे.आमच्या गावात "बाल गोपाल गणेश मंडळ" हे एकमेव मंडळ अनेक वर्षे गावाच्या एकतेचे प्रतीक राहिले. मला स्वतःला या मंडळाचे अध्यक्ष राहण्याचा सन्मान लाभला आहे. माझ्या मित्रमंडळींनी उत्साहाने सुरू केलेले हे मंडळ गावातील सर्व वयोगटांसाठी एक समान व्यासपीठ ठरले. साडेतीन हजार लोकसंख्येच्या गावात हेच एक मंडळ असायचे. जे मित्रांमध्ये कटुता असायची, जे एकमेकांशी बोलतही नसत – ते सुद्धा या उत्सवाच्या निमित्ताने एकत्र यायचे. गणपती बाप्पाच्या साक्षीने सर्व भांडणे, तंटे बाजूला ठेवून पुन्हा मैत्रीची नवी सुरुवात व्हायची. हा उत्सव म्हणजे समाजाला जोडणारा एक सुंदर धागा होता. पण आजचे चित्र वेगळे आहे. गावागावांमध्ये गल्लीगल्लीला गणेश मंडळाची पेव फुटली आहेत. गट-तट, राजकारण, ईर्ष्या-मत्सर यांनी या उत्सवाची पवित्रता मलिन केली आहे. बाप्पाची मूर्ती एकच असली तरी



लोकांच्या मनामध्ये मात्र विभागणी वाढलेली आहे. गणपती बाप्पा ऐक्याचा संदेश देतो, पण आपण मात्र विभाजन करत आहोत. लोकमान्य टिळकांनी हा उत्सव सुरू केला तो राष्ट्रीय एकात्मतेसाठी, समाजातील बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी. आजची परिस्थिती पाहून कदाचित टिळकांनाही खंत वाटत असेल की – "मी गणेशोत्सव सुरू केला तो लोकांना जोडण्यासाठी, फुटवण्यासाठी नव्हे!"

आजची खरी गरज आहे ती नव्या जाणीवेची. सार्वजनिक गणेशोत्सव म्हणजे केवळ रोषणाई, डीजे, मिरवणुकीची स्पर्धा नव्हे. तो आहे – गावातील मुलांना एकत्र आणण्याची संधी,

कटुता बाजूला ठेवून मैत्रीचे धागे विणण्याचे माध्यम,

सामाजिक संदेश देण्याचे व्यासपीठ,

आणि पुढच्या पिढीला संस्कृतीची परंपरा समजावून सांगण्याचे शाळाच.

**"एक गाव – एक मंडळ – एक उत्सव – एकता"**

ही संकल्पना आपण पुन्हा रूजवली, तरच सार्वजनिक गणेशोत्सव आपली खरी ओळख जपेल. अन्यथा विघ्नहर्त्याचा उत्सव स्वतःच विघ्नांनी व्यापला जाईल.

चला तर, यंदाचा गणेशोत्सव आपण पुन्हा एकदा टिळकांच्या मूळ भावनेप्रमाणे साजरा करूया. कटुता विसरूया, ऐक्याचा हात देऊया आणि खऱ्या अर्थाने सार्वजनिक गणेशोत्सवाला "सामाजिक उत्सव" बनवूया.

## गणेश गल्ली लालबाग गणपतीचा 'विश्वविक्रमी' मुंबईचा राजा!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रविणभाऊ पवार**

मुंबईचा राजा' च्या नावे जागतिक विक्रम! गणेश गल्ली येथील 'मुंबईचा राजा' म्हणून प्रसिद्ध असलेल्या लालबाग सार्वजनिक उत्सव मंडळाला इंग्लंडच्या 'ग्लोबल बुक ऑफ एक्सलन्स' या संस्थेकडून जागतिक विक्रमाचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

मंडळाने दोन विश्वविक्रम प्रस्थापित केले आहेत

१. सर्वात उंच मूर्तीची परंपरा (Tallest Idol Legacy): १९७७ सालापासून सर्वात उंच गणेश मूर्तीची परंपरा सलग ४८ वर्षे चालू ठेवणारे पहिले मंडळ.



२. सार्वजनिक संस्थांच्या श्रेणीमध्ये जगातील सर्वात मोठा २४-कॅरेट सोन्याचा हार: मुंबईचा राजाला अर्पण केलेला ५.५ किलो वजनाचा आणि १२ फूट लांबीचा सोन्याचा हार हा जगातील सर्वात मोठा आणि वजनदार हार ठरला आहे.

या मूर्तीची आणखी एक खासियत म्हणजे, ती कोणत्याही साच्याशिवाय, पूर्णपणे हाताने आणि पारंपरिक पद्धतीने घडवण्यात आली आहे.

हा पुरस्कार मंडळाच्या कलेचा आणि परंपरेचा जागतिक स्तरावरील एक मोठा सन्मान आहे.

उत्सव मंडळाचे पदाधिकारी अध्यक्ष किरण तावडे, सचिव स्वप्निल परब, खजिनदार नितेश महाडेश्वर, मा. पदाधिकारी महेंद्र तावडे, कार्यकर्ते, वर्गणीदार, देणगीदार, हितचिंतक आणि मंडळासोबत असणाऱ्या सर्व मुंबईच्या राजाच्या भाविकांचे त्रिवार अभिनंदन!

# जोगेश्वरीत जनता कॉलनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा भव्य गणेशोत्सव

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

जोगेश्वरी (पूर्व) जोगेश्वरीतील सुप्रसिद्ध जनता कॉलनी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यंदा ६७ वा वर्धापनदिन साजरा करीत असून, गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याची तयारी सुरू झाली आहे. मंडळाचे अध्यक्ष सुरेश परब, खजिनदार दीपक रेडकर व सरचिटणीस प्रल्हाद शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विविध सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. उत्सव कमिटी 2025 मंडळाचे अध्यक्ष कु. युवराज मोरे, खजिनदार श्री. राजेश लोके आणि सरचिटणीस श्री. सचिन आंबेतकर यांच्या नेतृत्वाखाली यंदाचा उत्सव भक्तिमय वातावरणात पार पडत आहे.

मंडळाच्या "मनोगत" मध्ये गणेशोत्सवाचे महत्त्व, लोकमान्य टिळकांनी दिलेला प्रेरणादायी वारसा तसेच सामाजिक ऐक्याचे महत्व अधोरेखित करण्यात आले आहे. समाजातील विविध स्तरातील लोक



एकत्र येऊन बंधुभावाने उत्सव साजरा करतात हा संदेश यामध्ये दिला आहे.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या अलौकिक सामर्थ्याने 'रेड्याच्या मुखातून वेद प्रवचन' घडवून आणल्याची कथा आजही जनमानसाला प्रेरणा देत आहे. या प्रसंगावर आधारित 'रेड्याच्या मुखातून वेद' हे चलचित्र यावर्षी प्रदर्शित होत असून भक्तगण व समाजात मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

संत ज्ञानेश्वर (१२७५-१२९६) हे मराठी संतसाहित्याचे आद्यप्रवर्तक. 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' या ग्रंथातून त्यांनी आध्यात्मिक मार्ग दाखविला. धर्मसंस्थेच्या शुद्धीकरणासाठी आणि समाजप्रबोधनासाठी त्यांनी केलेले कार्य आजही स्मरणात आहे.

दरम्यान, गणेशोत्सवानिमित्त विविध मंडळांमध्ये सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांबरोबरच संतांच्या जीवनावर आधारित संदेशमूलक चित्रफिती व चलचित्रांचे प्रदर्शन केले जात आहे. गणरायाच्या साक्षीने संतपरंपरेची शिकवण जनमानसात पोहोचावी यासाठी ही उपक्रमशीलता कौतुकास्पद ठरत आहे.

यावर्षी मंडळाने पर्यावरणपूरक सजावटीवर भर दिला असून, लहान मुलांसाठी स्पर्धा, सामाजिक उपक्रम, रक्तदान शिबिर तसेच महिलांसाठी विशेष कार्यक्रम घेण्याची योजना आखण्यात आली आहे.

मंडळाचे घोषवाक्य – "आम्ही जपतो परंपरा... आणि संस्कृती" – हे जनतेत उत्साहाचे वातावरण निर्माण करत आहे.

## पालोदकर महाविद्यालयात आण्विक भौतिकशास्त्राचे जनक अर्नेस्ट रदरफोर्ड जयंती साजरी



**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयात दिनांक ३० ऑगस्ट रोजी आण्विक भौतिकशास्त्राचे जनक अर्नेस्ट रदरफोर्ड यांची जयंती साजरी करण्यात आली व त्यांच्या कार्याविषयी माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विज्ञान शिक्षक दिलीप जाधव म्हणाले की, अर्नेस्ट रदरफोर्ड अल्फा आणि बीटा किरणांचा शोध लावला, किरणोत्सर्गी क्षयचे नियम मांडले आणि अणूची आण्विक रचना स्पष्ट केली. याप्रसंगी विद्यार्थिनी संजना निकम आपल्या भाषणात सांगितले, अर्नेस्ट रदरफोर्ड यांचा जन्म ३० ऑगस्ट १८७१ साली झाला, त्यांच्या प्रयोगांमुळे अणू केंद्रकाच्या वास्तविक परिमाणांसाठी एक महत्त्वपूर्ण क्रम स्थापित करता आला तर रसायनशास्त्रातील नोबेल पारितोषिकाचे पहिले विजेते म्हणूनही त्यांना गौरविले जाते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे म्हणाले की, ३० ऑगस्ट हा दिवस अर्नेस्ट रदरफोर्ड यांच्या कार्याचा आणि त्यांच्या वैज्ञानिक योगदानाचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जातो.

यावेळी महाविद्यालयातील शिक्षक प्रदीप कानडजे, सुनील तांबे, कृष्णा भांडारे, राजेश ठोंबरे, सुनील सागरे, कृष्णा पाटील, प्रा योगेश निंभोरे, प्रा एकनाथ जंजाळ, प्रा राजाभाऊ भोसले, भास्कर केरले, गजानन सपकाळ, गणेश दिवटे, विक्की चांदुरकर, डॉ रमेश काळे, संजय जाधव, महादेवी ठवरे, जयश्री चापे, संतुकराव मोरे, अक्षय निकम उपस्थित होते.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# कंपनी मोठी होण्यासाठी कर्मचाऱ्यांचा विश्वास महत्वाचा - लोकनेते रामशेठ ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

कोणतीही कंपनी मोठी व्हायची असेल तर त्यासाठी कर्मचाऱ्यांचा विश्वास महत्वाचा असतो. टीआयपीएल कंपनीमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी तो विश्वास सिद्ध करून जीव तोडून काम करतात असे गौरवोद्गार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यार्थ्यांच्या सन्मान सोहळ्यावेळी काढले.

दानशूर व्यक्तीमत्व असलेले माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमीत्त विविधि उपक्रम राबवले जात आहेत. त्यापार्श्वभुमीवर ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट प्रायव्हेट लिमीटेड अर्थात टीआयपीएल कंपनीमधील कर्मचाऱ्यांच्या इयत्ता दहावी आणि बारावी परिक्षेमध्ये उज्वल यश संपादीत केल्या पाल्यांचा सत्कार सोहळा शनिवारी आयोजीत करण्यात आला होता. हा सन्मान सोहळा खांदा कॉलनी मधील सीकेटी महाविद्यालयात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले कि, आत्ता पासून दरवर्षी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जाईल. टीआयपीएलमधील कर्मचाऱ्यांच्या मुलांना पुढील शिक्षणासाठी देखील कंपनी मदत करेल. तसेच टीआयपीएलच्या कर्मचाऱ्यांच्या मुलांना देखील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या महाविद्यालयांमध्येही ५० टक्के फी माफी देण्याचे त्यांनी जाहीर केले. या कार्यक्रमात लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते परेश ठाकूर आणि टीआयपीएलचे डायरेक्टर अमोघ ठाकूर यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी टीआयपीएलचे डायरेक्टर सीएच भरणीकुमार, एम.पी.त्यागी, अरुण नाईक, जगदीश घरत, शशिकांत मुंबईकर, आनंद लाल, सतीश उगले, दीपक सिन्हा यांच्यासह टीआयपीएलचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



यावेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, आपण जो शब्द देतो तो पाळतो हा विश्वास कंपनीच्या अधिकारी आणि कार्मचाऱ्यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली निर्माण केला. तर परेश ठाकूर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सध्याचे हे स्पर्धेचे युग आहे. जेवढे महत्व परिक्षांमध्ये गुणांना आहे तितकेच महत्वाचे व्यक्तिमत्व विकासही आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी या कौशल्य गुणावर भर द्यावे, असे आवाहन केले.

या कार्यक्रमात दहावीच्या परिक्षेत कार्तिकी आर्गे, सानीका पाटील, स्वरा खेडकर, दुर्वा कडू, श्रेया घरत, पार्थ मोहिते, वैदेही म्हात्रे, अव्नी लाल, सेजल ठाकूर, युग मोकल, करुण्या गायकर, अनन्या चौहान तसेच बारावीच्या परिक्षेत श्रद्धा श्रीवास्तव, पार्थ सकपाल, गार्गी काले, जय तांडेल, शुभम कोळी, काजल कुमारी व इतर विद्यार्थ्यांचा घवघवीत यश संपादन केल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

## युवा कार्यकर्ते समीर सय्यद यांचा वाढदिवस उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**अंभोरा (प्रतिनिधी)**

अंभोरा गावातील उत्साही, मनमिळाऊ व सामाजिक कार्यात नेहमी आघाडीवर असलेले युवा कार्यकर्ते समीर सय्यद यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. ३० ऑगस्ट १९९६ रोजी जन्मलेले समीर सय्यद यांनी यंदा जीवनातील २८ वर्षे पूर्ण केली. बालपणापासूनच मनमिळाऊ स्वभाव, इतरांच्या सुख-दुःखात नेहमी धावून जाण्याची वृत्ती, समाजहिताची तळमळ आहे.

ग्रामविकास व सामाजिक चळवळीतही सय्यद यांचे योगदान उल्लेखनीय आहे. त्यांच्या आईची ग्रामपंचायत सदस्यपदी निवड झाली असून कुटुंब परंपरेतूनच समाजकारणाची प्रेरणा मिळाली सांगतात.

समीर सय्यद हे सरपंच सागर आमले यांचे खंदे समर्थक असून, ग्रामविकासाच्या विविध उपक्रमांत त्यांनी सातत्याने भाग घेतला आहे. युवकांमध्ये त्यांनी एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

वाढदिवसानिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. शुभेच्छा देण्यासाठी राजू सय्यद, परसराम आमले, महादेव आमले यांच्यासह मित्रमंडळी उपस्थित होते.

या प्रसंगी "समीर सय्यद यांचे आयुष्य निरोगी, आनंदी व यशस्वी होवो," अशा शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.



## माणगाव उतेखोल वाडी येथे श्री गणेशा आरोग्याचा आरोग्य अभियान संपन्न ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**माणगाव तालुका प्रतिनिधी संदेश बांदल**

माणगाव तालुका मधील उतेखोल वाडी येथील श्री गणेशा आरोग्याचा आरोग्य अभियान संपन्न झाला त्यावेळी उतेखोल वाडी ग्रामस्थांनी चांगला प्रतिसाद दिला त्यावेळी माणगाव उप रुग्णालय डॉक्टर कोकणे मॅडम , डॉक्टर कुणाल सर ,सुरज महाडिक, आधी परिचारक संजीत गायकवाड, टेक्निशियन, प्रतिक्षा सावंत, टेक्निशियन उपस्थित होते




## बबन विश्वकर्मा यांची शेकाप महानगरपालिका जिल्हा सहचिटणीस पदी निवड

**दैनिक युवक आधार**



**नवीन पनवेल वार्ताहर** : बबन विश्वकर्मा यांची शेतकरी कामगार पक्षाच्या पनवेल महानगरपालिका जिल्हा सहचिटणीस पदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, या सर्व विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे. नवीन पनवेल येथे राहणारे बबन विश्वकर्मा यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. तसेच गरजूंना मदत करण्यात त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत शेकापने त्यांच्यावर जिल्हा सहचिटणीस पदाची जबाबदारी सोपवली आहे.

## परतूर बस आगारातील चालक शेख अब्दुल रहीम चाऊस यांचा सेवागौरव सोहळा संपन्न..

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना(अशोक ठोके)**

परतूर येथील बस आगारातील चालक शेख अब्दुल रहीम चाऊस यांचा वयानुरूप सेवानिवृत्त झाल्याबद्दल परतूर आगाराच्या वतीने सेवागौरव करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आगार प्रमुख माधुरी देशमुख या उपस्थित होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त विभागीय वाहतूक अधिकारी पंडित चव्हाण,मुख्यध्यापक संजय जाधव,पत्रकार योगेश बरीदेयांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आगार प्रमुख माधुरी देशमुख यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले की, आपल्या आगार विभागात सर्वात महत्वाचे पद हे चालकाचे आहे प्रवासी सुरक्षा ला प्राधान्य देत सर्वानी आपली जवाबदारी चांगल्या पद्धतीने पार पाडली पाहिजे तसेच अब्दूल राहिम यांनी विना अपघात सेवा केल्या बद्दल त्यांचे अभिनंदन केले. यावेळी वाहतूक नियंत्रक श्रीमती सुरेखा साळवे,श्रद्धा कुलकर्णी, नाथा ढेंगळे आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम पी गोडबोले यांनी केले तर भुजंग गोरे यांनी आभार मानले.

# धनज येथील दारू तात्काळ बंद करा महिलांचे पोफाळी ठाणेदार यांना निवेदन

### ग्रामसेभेत ठराव मंजूर करून दारु बंदीचा निर्णय



**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड**

उमरखेड तालुक्यातील आदिवाई बहुल गाव धनज या गावात गेल्या अनेक वर्षांपासून खुलेआम दारूची अवैध विक्री सुरू आहे ज्यामुळे अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहे. वारंवार मागणी करूनही दारूबंदी होत नसल्याने आज संतप्त झालेल्या गावातील महिलांनी गावामध्ये दारु बंद झालीच पाहिजे,मटका बंद झालाच पाहिजे अशी घोषणा देत दारू पाडणाऱ्याच्या घरी जाऊन दारू बंद झाली पाहिजे अशा घोषणा देत संपूर्ण गावात फेरी मारून ग्रामसभेचा ठराव घेऊन पोफाळी पोलीस स्टेशन चे ठाणेदार पंकज दाभाडे यांना निवेदन दिले. महिलांनी पोफाळी पोलीस स्टेशनच्या कार्यालयात जाऊन या धंद्यांना आळा घालण्याची मागणी केली. कुटुंबातील करता पुरुष व्यसनाधीन होत असल्याने महिलांना व लहान मुलांना त्रास होत आहे. तसेच विद्यार्थी व तरुणाई देखील दारूच्या व्यसनाला बळी पडत आहेत .या अवैध धंद्याच्या विरोधात कारवाई व्हावी म्हणून गावातील 100 महिला व मोठ्या प्रमाणात पुरुष मंडळी पोलीस ठाण्यात आले व.आमच्या येथील दारू बंद करा . अशी मागणी यावेळी ठाणेदार पंकज दाभाडे साहेबांना विनवणी केली निवेदन करण्यात आले व गावात दारू सहज उपलब्ध असल्यामुळे गावातील शांतता भंग होऊन गरीब व मध्यमवर्गीयांचे संसाराचा आर्थिक बजेट विस्कळीत होऊन महिलांना कुटुंबाचा भार चालवणे कठीण झाले आहे. सदर अवैध दारू विक्री व प्रतिबंध करून अवैध दारू विक्रीची पाळेमुळे शोधून संबंधितांना कडक शासन कारवाई व्हावी असे या निवेदनात म्हटले आहे .यावेळी गावच्या सरपंच वनिताताई देवानंद पाचपुते ,पोलीस पाटील बापूराव धनवे ,तंटामुक्ती अध्यक्ष राघो गायकवाड ,उपाध्यक्ष सयाबाई व्यवहारे, माजी तंटामुक्ती अध्यक्ष अण्णाजी बोंबले, एडवोकेट मजर देशमुख, दत्तप्रसाद जाधव ,देवानंद पाचपुते ,कानिकनाथ गुहाडे , ज्ञानेश्वर राठोड, नामदेव बोंबले, गजानन धनवे,गजानन राठोड,किसन पठाडे,रमेश ढोबळे,रफीक शेख, जावेद शेख,प्रविण ढोबळे,अशिष डोगंरे,विनोद राठोड,मिथुन राठोड ,पंडीत चव्हाण ,अंकुश बोबंले,विष्णु चव्हाण, विरेन डोगंरे,राहुल व्यवहारे गावातील महिला व गावकरी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माणुसकीचा अनोखा उपक्रमः 'जिव्हाळ्याची भिंत'ने ७५ विधवा आणि एकल भगिनींना दिला सणासुदीचा आधार

**दैनिक युवक आधार -**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

**घाटंजी** - सण-उत्सवाच्या काळात समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देण्यासाठी प्रा. ईश्वरलालाजी द्रोणा यांच्या संकल्पनेतून घाटंजी शहरात एक अभिनव उपक्रम राबवण्यात आला. 'जिव्हाळ्याची भिंत' अन्नदान छत्राच्या माध्यमातून ७५ विधवा आणि एकल भगिनींना 'आपुलकीचा शिधा' देऊन त्यांना सणासुदीचा आनंद घेण्यास मदत करण्यात आली.

पोळ्याच्या दिवसापासून सुरू झालेल्या या उपक्रमाचा मुख्य उद्देश, या भगिनींच्या आयुष्यातील प्रत्येक सण उत्साहात साजरा व्हावा हा आहे. हा केवळ किराणा वाटप कार्यक्रम नव्हता, तर त्यांना मायेचा आणि आधाराचा हात देण्याचा एक प्रयत्न होता. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. द्रोणा यांना सूरज हेमके, विकी तेलंग आणि दर्शन कुमरे यांनी मोलाची साथ दिली.

'आपुलकीचा शिधा' या नावाने राबवलेल्या या कार्यातून माणुसकी आणि संवेदनशीलता यांचा सुंदर संदेश समाजाला मिळाला आहे. या अनोख्या उपक्रमामुळे अनेक चेहऱ्यांवर हास्य फुलले असून, समाजात सकारात्मकता पसरवण्याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.



# सुरगाणा महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन व बक्षीस वितरण कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. सी.जी. दिघावकर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय क्रीडा दिन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमात महाविद्यालयातील क्रीडा प्रकारामध्ये जिल्हा,विद्यापीठस्तरीय प्रकारात यशस्वी विद्यार्थी कावेरी महाले (हॅंड बाल ),मयुरी जाधव,वनराज जाधव ( खो,खो) यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.




कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. रवींद्र हिरे यांनी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात शिक्षण घेत असताना व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक असलेल्या कौशल्ययुक्त क्रीडा प्रकारात सहभागी झाले पाहिजे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की यशस्वी विद्यार्थी घडविण्याचे काम महाविद्यालयातील क्रीडा विभागाची महत्त्वाची भूमिका आहे. हॉली बाल, हॉलीबॉल, टेबल टेनिस, क्रिकेट, खो खो, कबड्डी हे क्रीडा प्रकारामध्ये उस्फूर्त सहभाग घेऊन राज्य,राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पातळीवर यशस्वी झाल्यास करिअरच्या संधी प्राप्त होऊ शकतात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांनी भारताची ओळख जगाच्या पातळीवर उंच केली त्यांचा आदर्श महत्त्वाचा आहे. असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन क्रिडा संचालक डॉ.संतोष पवार यांनी केले. तर आभार महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. विजय अहिरे यांनी मानले.

यावेळी कार्यक्रमाला डॉ. चंद्रकांत पाटील, प्रा.गुलाब पवार श्री.आर.टी. शिंदे,श्री.जी.डी.भालेराव,प्रा.बी.डी.धुम यांच्या सह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.विद्यार्थी मोठ्या प्रमाणात कार्यक्रमाला उपस्थित होते.

## पिंपळगाव ब. वीट भट्टी परिसर प्रदूषण मुक्त करा अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा निर्भय महाराष्ट्र पार्टी व महात्मा रावण किंग फाउंडेशन

दैनिकः युवक आधार
कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)

पिंपळगाव बसवंत नगरपरिषद हद्दीतील वीट भट्टी निफाड रोड परिसरातील वीट भट्टी झोपडपट्टी परिसरामध्ये साधारणपणे पाच ते दहा हजार लोकसंख्येची वस्ती आहे या होणाऱ्या प्रदूषणामुळे या वस्तीत राहत असलेल्या नागरिकांना त्रास होत आहे या परिसरातील नागरिक सतत आजाराने ग्रास्त आहेत आणि या परिसरामध्ये आता सतत होणाऱ्या पावसामुळे येथे चिखल निर्माण झालेले असून या घाणीच्या अतिशय दुर्गंध सुटलेला आहे आणि उन्हाळ्याच्या दिवसात हा कचरा पेटून दिलेला असल्यामुळे या कचऱ्यातून निघणारा वायू हा मानवी शरीराला अतिशय घातक असल्यामुळे हा परिसर स्वच्छ करणेत यावा. ग्रामपंचायत प्रशासनाच्या काळामध्ये येथील एच ए एल




च्या सी आर एस फंडामधून घनकचरा प्रकल्प देण्यात आला होता परंतु तो प्रकल्प नगरपरिषद आल्यापासून बंद पडलेल्या अवस्थेत असल्यामुळे आपण नगरपरिषद अधिकारी यांनी एच ए एल सोबत चर्चा करून हा घन कचरा प्रकल्प सुरू करावा. हा प्रकल्प जर सुरू झाला तर कचरा बऱ्या प्रमाणात कमी होऊन येथील नागरिकांना थोड्या प्रमाणात का होईना स्वस्त वाटेल त्यामुळे हा जो वीटभट्टी परिसर परिसर प्रदूषण मुक्त करा सदर कचरा डेपो परिसरात असलेला घनकचरा प्रकल्प सुरू करा अशी मागणी नगरपरिषदेकडे यावेळी निर्भय महाराष्ट्र पार्टी निफाड तालुका अध्यक्ष संतोष सुरवाडकर व पिंपळगाव शहराध्यक्ष फारुख शेख तसेच महात्मा रावण किंग फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष दत्तू भाऊ झनकर यांनी केली शहरातील घनकचरा प्रश्न हा गेले कित्येक वर्षापासून प्रलंबित आहे योग्य तो निर्णय वेळीच घ्यावा अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशारा यावेळी देण्यात आला याप्रसंगी निर्णय महाराष्ट्र पार्टी तालुका अध्यक्ष संतोष सुरडकर शहराध्यक्ष फारुख शेख व महात्मा रावन किंग फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष दत्ता भाऊ झनकर व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वन्य प्राण्यांच्या त्रासामुळे मोठ्या प्रमाणात कपाशी व तुर पिकांचे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-जितेंद्र खोडे**

**राळेगावः-** तालुक्यातील सावरखेड, विहीरगांव,वेडशी,वरध या शेत शिवारात वन्यप्राण्यांच्या रोही,व डुकराच्या अशा जंगली जनावरांचा धुमाकूळ असल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान होत असल्याचे दिसून येते,अशाच एका सावरखेड शेतकऱ्याच्या हेमराज कुडमते यांचे शेत जंगलाला लागलेले आहे तर यांच्या शेतातील कपाशी व तूर पिकाचे रोही व नीलगाय यांनी संपूर्ण पिकाचे नुकसान केले आहे,त्या शेतकऱ्यांकडे एकूण नऊ एकर शेती असून चार ते पाच एकरात पूर्ण कपासीचे नुकसान केले आहे,तर त्याचे कमीत कमी एक ते दीड लाखाचे नुकसान



झाले आहे,आज त्या शेतकऱ्यावर कर्जाच्या डोंगर असताना सुद्धा त्या शेतकऱ्याकडे कोणतीही सोय नसताना सुद्धा त्याने आपल्या पत्नीचे पिवळं सोन गहाण ठेवून आपली शेती उभी केली होती, पण आता हाती आलेला मालाची संपूर्ण त्या जंगली जनावरामुळे मोठे कपाशी पिकाचे नुकसान केले आहे,त्या शेतकऱ्यावर कर्जाचे संकट ओढवले आहे.अतिवृष्टीच्या झपाट्यातून सावरलेल्या शेतकऱ्याने कष्ट मेहनतीने खरीप हंगामातील पिकांची हिरवळ फुलविली त्यात महिन्यानंतर पाऊस बरसायला सुरुवात झाली शेतकऱ्याचा जीवात जीव आला आणि दुसरीकडे पावसामुळे जीवदान मिळालेल्यालेल्या पिकांवर रानडुकरांसह वन्य प्राण्यांनी नुकसानीचा सपाटा सुरू केला आहे. ही परिस्थिती तालुक्यातील सावरखेडा शिवारातील पिकांची शेतकऱ्यावर पीक नुकसानीची कुराट कोसळल्याने शेतकरी चांगलाच अडचणीत सापडत असल्याचे चित्र आहे.त्या सावरखेड शिवारातील सर्व शेतकऱ्याची वनविभाग अधिकारी आणि कृषी अधिकारी यांनी लक्ष द्यावे व नुकसान भरपाई देण्यात यावी अशी सर्व शेतकऱ्याची मागणी आहे.

# ऐन सणासुदीत ग्रामपंचायत निधीमुळे लासलगावचे दिव्यांग आनंदीत

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण निफाड प्रतिनिधी**
ऐन सणासुदीच्या दिवसात लासलगाव ग्रामपंचायतीने दिव्यांग बांधवांना आनंदित केले असून गत आर्थिक वर्षाचा दिव्यांग निधी वाटप केल्यामुळे लासलगाव परिसरातील सर्व दिव्यांग बांधव आनंदी झालेले असून ग्रामपंचायतीला धन्यवाद देत आहेत. शुक्रवार दिनांक 29 ऑगस्ट रोजी ग्रामपंचायत सभागृहामध्ये ग्रामपंचायतचे वतीने आयोजित करण्यात आलेल्या निधी वाटप सोहळ्यामध्ये व्यासपीठावर उपस्थित सरपंच योगिताताई पाटील उपसरपंच रामनाथ शेजवळ, ग्रामपंचायत सदस्य दत्ता पाटील, आमिताताई ब्रह्मेचा,अफजल शेख, महिला दक्षता समिती अध्यक्ष वेदिकाताई होळकर, युवा नेते व लासलगाव विभाग सहकारी खरेदी विक्री संघाचे चेअरमन शंतनू पाटील, योगेश पाटील, सतिश अहिरे आदींच्या प्रमुख उपस्थितीमध्ये ग्रामपंचायत अधिकारी संजय बाविस्कर यांनी आयोजित सोहळ्याचे प्रास्ताविक करून दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या निधीबद्दल तसेच अन्य विविध योजनांबद्दल देखील माहिती दिली. या निधीचे खरे हक्कदार हे फक्त गरजू तीव्र, अति तीव्र दिव्यांगत्वाने पीडित अपंग व्यक्ती असून यामध्ये कोणीही बोगस वा गैरमार्ग अवलंब करून मिळविलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र धारण करून लाभ घेण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन देखील त्यांनी केले. सरपंच योगिताताई यांनी त्यांच्या मनोगतात दिव्यांग बांधवांना ग्रामपंचायतीकडून सर्वतोपरी सहकार्य आणि मदत करण्याचे आश्वासन दिले. उपसरपंच शेजवळ म्हणाले की, ग्रामपंचायतने यापूर्वी देखील कधीही दिव्यांगांची अडवणूक केलेली नव्हती व भविष्यात देखील केली जाणार नाही, मात्र कोणी आगंतुक इसम आपल्याला ग्रामपंचायत निधी, उत्पन्न आदी बाबत अवास्तव आणि बिनबूडाची आकडेवारी, चुकीची माहिती देऊन अधिक निधीची लालच देत असल्यास त्याच्याकडे



दुर्लक्ष करावे आणि कोणतेही शंकेबाबत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची संपर्क साधावा. याप्रसंगी वेदिकाताई होळकर आणि शंतनू पाटील यांनी *दिव्यांगांचे काम पाहण्यासाठी एखाद्याच व्यक्तीला अधिक महत्त्व न देता दिव्यांगांनी सर्व मताने स्थापन केलेल्या 10 सदस्य समिती उपक्रमाचे कौतुक केले आणि या समितीमार्फतच दिव्यांग संबंधीचे सर्व अडीअडचणी प्रश्न हाताळले जावेत, याबद्दल ग्रामपंचायत प्रशासनाला मार्गदर्शन केले. केवळ पाच टक्के निधी वाटपावरच समाधान मानता शासनामार्फत सध्या सुरू असलेल्या आणि भविष्यात येऊ घातलेल्या दिव्यांगांच्या हितासाठीच्या सर्व योजना यादेखील ग्रामपंचायतीने दिव्यांग समितीमार्फत गरजू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणेकामी कार्यरत राहावे, अशी सूचना देखील त्यांनी केली. वेदिका ताई आणि शंतनू पाटील यांच्या या विधायक सूचनेला व्यासपीठावर उपस्थित सर्वच मान्यवरांनी आणि दिव्यांग यांनी जोरदार पाठिंबा दिला. यावेळी ग्रामपंचायतीने लासलगाव परिसरातील अपंगांना संघटित करून प्रथम अपंग सेवा संस्था स्थापन करण्यामध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नेते संजय पाटील आणि खऱ्या दिव्यांगांच्या पाठीशी सतत उभे राहणाऱ्या तत्कालीन सरपंच जयदत्त होळकर यांच्या प्रयत्नांमधून आणि पुढाकारातून लासलगाव ग्रामपंचायतीमार्फत दिव्यांगांना आकारल्या जाणाऱ्या घरपट्टीच्या रकमेमध्ये 50% इतकी सूट 2018/19 पासून पूर्वलक्षी प्रभावाने जाहीर करून दिव्यांगांना एक प्रकारे जणू बोनस दिला. याप्रसंगी दिव्यांग बांधवांच्या मनोगतामध्ये नम्र नमूद करण्यात आले की, ग्रामपंचायतकडून वेळोवेळी निधी वाटपामध्ये न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जातो, शिवाय दिव्यांगांच्या कोणत्याही अडीअडचणी असल्या तरी त्या कार्यकारी मंडळ ग्रामपंचायत अधिकारी आणि संबंधित कर्मचारी वर्गांकडून समजूतदारपणाने हाताळल्या जातात. दिव्यांग बांधवांना निधीबाबत दिशाभूल करून चुकीची माहिती देणाऱ्या कोणाही असंतुष्टांच्या भूलथापांना बळी न पडता दिव्यांगाने दिव्यांग सेवा समितीच्या सदस्यांकडेच अधिकृतपणे संपर्क साधून माहिती करून घ्यावी. लासलगाव परिसरातील दिव्यांगांनी यावेळी सर्वमताने मोठ्या उत्स्फूर्तपणे असे ठरवले की, भविष्यात अपंगांचे आधारस्तंभ माजी मंत्री बच्चू कडू यांच्या मार्गदर्शनाने स्थापन करण्यात आलेल्या आणि प्रहार दिव्यांग आंदोलन संघटना प्रणित दिव्यांग समितीद्वारे नियुक्त करण्यात आलेले दिव्यांग सदस्य हेच लासलगाव परिसरातील दिव्यांगांच्या सर्व अडचणी, दिव्यांगांशी संबंधित कामकाज वगैरे बाबी हाताळेल.अन्य कोणीही एखाद्या इसमाने संघटनेचे नावाचा वापर करून व स्वतःला अध्यक्ष,पदाधिकारी दाखवून, बच्चू कडू यांच्या नावाचा कोणत्याही कामासाठी वापर करून वा बच्चु कडूंचा फोटो, संघटनेचे नाव छापलेले लेटर पॅड आदींचा वापर करण्याचा प्रयत्न करीत असल्यास तात्काळ समिती सदस्यांच्या निदर्शनास आणून द्यावे. आपल्याला ग्रामपंचायत कार्यकारी मंडळ आणि कर्मचारी यांच्याशी सहकार्य सामोपचाराने वाटचाल करायची असून त्यांच्याशी कोणते प्रकारे वाद विवाद दिव्यांगांच्या हिताला योग्य नसल्याची देखील जाणीव करून देण्यात आली. याप्रसंगी एकूण दिव्यांग निधी रुपये चार लाख 95 हजार ची रक्कम प्रत्येक पात्र दिव्यांगाच्या थेट बँक खात्यामध्ये प्रत्येकी रुपये 4500 प्रमाणे एन इ एफ टी मार्फत वर्ग करण्यात आली, शिवाय ग्रामपंचायतीने सर्व उपस्थित दिव्यांगांना अल्पोपहार आणि चहापाण्याची देखील उत्तम सोय केली होती. सदर सोहळा यशस्वी करण्यासाठी लासलगाव ग्रामपंचायतच्या सर्व कर्मचाऱ्यांनी आणि दिव्यांग समितीचे मनोज परेराव, भूपेंद्र जैन, अविनाश देसाई, चंद्रकांत भावसार, प्रवीण गाढे, किरण देसाई, संजय विसपुते, सागर धुमाळ, ताईबाई घोडे, राजाभाऊ सुराशे, यांनी परिश्रम घेतले.

## माकडाला रेस्क्यू करून जंगलात दिले सोडून



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
: रहिवाशी भागात उपद्रव करणाऱ्या माकडाला एन जे रेस्क्यू टीम आणि वनविभाग पनवेल यांनी रेस्क्यू करून सुखरूपपणे जंगलात सोडून दिले आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय एअरपोर्टच्या बाजूला चिंचपाडा येथील एका इमारतीमध्ये माकड शिरल्याची माहिती वनविभागाचे आर एफ ओ गजानन पानपट्टे आणि वनरक्षक जगदीश यांना माहिती देण्यात आली. गेले पाच दिवस हा माकड येथे त्रास देत होता. यावेळी एन जे रेस्क्यू टीमचे नितेश जाधव यांनी आपली टीम पाठवली. राजेश ठाकूर, सौरव म्हात्रे, प्रदीप गाडे, सचिन कुलकर्णी, रितिक सावंत, अश्विन भगत या टीमने आणि वन विभागाने या माकडाला एका तासात रेस्क्यू केले, त्यामुळे इमारतीच्या रहिवासींनी एनजे टीमचे आभार मानले. 29 ऑगस्ट रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास या माकडाला वनरक्षक जगदीश आणि नेचर फ्रेंड सोसायटी या संस्थेचे अध्यक्ष संतोष उदरे आणि नितेश जाधव यांच्या उपस्थितीत निसर्गात सोडून देण्यात आले.

## जोगेश्वरीत मुलांमध्ये ‘Save Trees’ विषयी जनजागृती – चित्रकला स्पर्धा उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**मुंबई जोगेश्वरी (पूर्व )**
श्री साई सिद्धी मंदिर सेवा संस्था यांच्या सहकार्याने M.L. दहानुकर कॉलेजच्या DLLE (Department of Lifelong Learning and Extension) युनिटतर्फे मुलांसाठी “Save Trees” या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला समितीचे अध्यक्ष श्री. महेंद्र केळकर, सचिव विवेक दळवी तसेच खजिनदार प्रसाद वेंगुर्लेकर यांची उपस्थिती लाभली. DLLE युनिट दरवर्षी गणेश मंडळे, अंगणवाडी, शाळा, अनाथालय अशा विविध ठिकाणी जाऊन सामाजिक जाणीव व उपयुक्त विषयांवर स्पर्धा आणि कार्यक्रमांचे आयोजन करते. पर्यावरण संवर्धन, सामाजिक प्रश्न याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. यावर्षीच्या उपक्रमात मुलांनी झाडांचे महत्त्व, निसर्गरक्षण आणि पर्यावरण वाचविण्याचे संदेश आपल्या चित्रातून मांडले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाविषयी माहिती देण्यात आली. DLLE युनिट सामाजिक जाणिवेबरोबरच समाजसेवा देखील करते. याअंतर्गत “Beach Clean-up” सारखे उपक्रम राबवून प्रत्यक्ष कृतीतून संदेश दिला जातो. या उपक्रमामुळे विद्यार्थी व समाज – दोघांचाही सर्वांगीण विकास घडतो, असे यावेळी सांगण्यात आले.









## महाराष्ट्र ब्राम्हण सभेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी महेश सारणीकर यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**उपसंपादक :- राजू शिंदे**
महाराष्ट्र ब्राम्हण सभा ही स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या विचाराने प्रेरित झालेली संस्था असून देशभरात ह्या संस्थेचे काम चालते. संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री अतुलजी व्यास तसेच महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री मयुरेश अरगडे कार्याध्यक्ष श्री चैतन्य जोशी व सर्व विश्वस्तांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात विस्तार करण्यासाठी माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिसमित्र समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य अध्यक्ष श्री महेश सारणीकर यांची महाराष्ट्र ब्राम्हण सभेच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली.



संस्थेच्या माध्यमातून ब्राम्हण समाजाच्या अडीअडचणी सोडवत समाजाला न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहतील ही अपेक्षा ठेवत त्यांच्या कार्याची दखल घेऊन ही मोठी जवाबदारी संस्थेने त्याच्यावर सोपवली आहे. श्री महेश सारणीकर यांच्यासारखे निर्भीड पदाधिकारी संस्थेने निवडले आहेत की जे सर्वसामान्य ब्राम्हण समाजाच्या व्यथा – समस्या ह्या सरकार पर्यंत पोहचवून समाजाला योग्य दिशा दाखवत समाजाला न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी सदैव प्रामाणिक प्रयत्न करतात. ब्राम्हण समाजाला पुढे नेत समाजातील बेरोजगार तरुणांना रोजगारीच्या संधी उपलब्ध करून देऊन एक भक्कम नेतृत्व करत समाजाला पुढे नेण्याचं काम श्री महेश सारणीकर ह्या महाराष्ट्र ब्राम्हण समाजाच्या वत्तीने करतील अशी अपेक्षा आहे.

श्री महेश सारणीकर हे प्रथमपासूनच सामाजिक कार्यात सहभागी आहेत, माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिसमित्र समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य अध्यक्ष आहेत, ज्यामार्फत समाजातील सर्वच स्तरातील अडी अडचणी सोडवत, लोकांना समितीच्या माध्यमातून पाठबळ मिळवून देवून प्रशासकीय, सामाजिक विकास, माहिती अधिकार, पत्रकारिता त्याबरोबर पोलिस प्रशासन आणि जनता यांचा समन्वय या पाचही क्षेत्रात प्रभावीपणे समितीच्या सर्वच पदाधिकाऱ्यांचे हात कायम बळकट करून सामाजिक भावनेतून कार्य करत आलेले आहेत.

त्यांच्या पुढील वाटचालीस माहिती अधिकार पत्रकार संरक्षण व पोलिसमित्र समितीचे सर्वच पदाधिकारी, मित्र परिवार, ब्राम्हण समाजातील अनेक मान्यवर मंडळींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## मा.शिवाजीदादा निंबाळकर यांची भाजपाच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**



इंदापूर तालुक्यातील सणसर गावचे सुपुत्र व श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान संचालक मा.शिवाजीराव रामराव निंबाळकर यांची पुणे जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. मा.श्री.रविंद्रजी चव्हाण साहेब,प्रदेशअध्यक्ष भाजपा महाराष्ट्र,मा ना श्री.चंद्रकांत दादा पाटील,केंद्रीय मंत्री मा.ना.श्री.मुरलीधर मोहोळ साहेब,प्रदेश सरचिटणीस मा.श्री.राजेशजी पांडे साहेब व जिल्हा समन्वयक आमदार ॲड.श्री.राहुलदादा कुल यांच्या मान्यतेनूसार भाजपा पुणे ग्रामीण दक्षिण विभागाच्या नूतन जिल्हा पदाधिकारी यांची यादी घोषित करण्यात आली आहे.मा.शिवाजीराव निंबाळकर यांचे निवड घोषित झाल्यानंतर सणसर गावातील कार्यकर्ते यांच्यात आनंदीमय वातावरण निर्माण झाले आहे.

# रायगडमध्ये ड्रोन वापरावर दोन महिन्यांची बंदी

### रेवदंडा आगरकोट किल्ला, बीच व साळाव ब्रिजवर मात्र अनधिकृत ड्रोन प्रशासनाचे डोळे झाक?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
जिल्ह्यातील संवेदनशील भागांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पुढील दोन महिन्यांसाठी रायगड जिल्ह्यात पोलीस विभागाची पूर्वपरवानगी शिवाय ड्रोन कॅमेऱ्याचा वापर करण्यास बंदीचे आदेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केले आहेत.पोलीस अधीक्षकांच्या अहवालानुसार, रायगड जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, धरणे, केंद्रीय संस्था तसेच समुद्रालगतचे भाग हे दहशतवादी कारवायांसाठी अत्यंत संवेदनशील मानले जातात. याआधी देशातील विविध भागांत दहशतवादी आणि विघातक कारवायांसाठी ड्रोनचा वापर झाल्याची उदाहरणे आहेत. रायगडमध्ये रात्रीच्या वेळी अनधिकृत ड्रोन उडवल्याच्या तक्रारी पोलीसांकडे नोंदवल्या गेल्या असून त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.ड्रोनद्वारे टेहळणी करून दहशतवादी हल्ले घडवून आणण्याची शक्यता, चोरी व अन्य गुन्ह्यांसाठी माहिती संकलन होण्याचा धोका, तसेच ड्रोनवरून केलेले चित्रिकरण विघातक कृत्यांसाठी वापरले जाण्याचा अंदाज लक्षात घेऊन



जिल्हाधिकारी यांनी हे आदेश जारी केले आहेत. पुढील काळात कोणीही ड्रोनचा वापर करायचा असल्यास ७ दिवसांपूर्वी संबंधित पोलीस ठाण्यात अर्ज करून परवानगी घेणे बंधनकारक राहील.मात्र, या आदेशांच्या पार्श्वभूमीवर रेवदंडा आगरकोट किल्ला, रेवदंडा बीच आणि रेवदंडा–साळाव ब्रिज परिसरात अनधिकृतपणे ड्रोन उडवले जात असल्याचे गंभीर आरोप नागरिक, पर्यटक व शिवप्रेमींनी केले आहेत. उद्या या ठिकाणी काही गैरप्रकार घडला तर त्याला जबाबदार कोण? प्रशासन जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहे काय? या प्रश्नांनी स्थानिक नागरिकांमध्ये संताप व संशयाचे वातावरण निर्माण केले आहे. सरकारी अधिकाऱ्यांमध्ये नेमके काय गुपित लपवले जात आहे? परवानगीशिवाय संवेदनशील ठिकाणीच ड्रोन उडवले जात असताना शासन एकीकडे बंदीचे आदेश देत असले, तरी दुसरीकडे रेवदंडा परिसरात चालणाऱ्या या बेकायदेशीर प्रकाराकडे डोळेझाक का केली जाते, असा थेट सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.रायगडकरांना अपेक्षा आहे की शासन व प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तात्काळ लक्ष घालून रेवदंडा आगरकोट किल्ला, बीच आणि साळाव ब्रिज परिसरातील अनधिकृत ड्रोन उडण्यामागील साखळी उघड करावी, अन्यथा उद्या एखादा गंभीर प्रकार घडल्यास जबाबदारी टाळता येणार नाही.

## महिला स्वयंसेवकांना मिळाली उमेद

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड :-** उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान गणेश उत्सव 2025 अंतर्गत 48 विक्री केंद्रातून महिला बचत गटांनी 1 कोटी 29 लक्ष 47 हजार 470 रुपयांची विक्री केली. सिल्लोड तालुक्यात एकूण 48 बचत गटांनी गणपती विक्री केंद्र उभारून 44183 गणेश मूर्तींची विक्री केली आहे. पंचायत समिती आवारात तालुकास्तरीय मार्केटमध्ये व मोठमोठ्या गाव स्तरावरती हे विक्री केंद्र उभारले होते. यासाठी माननीय रत्नाकर पगार गट विकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उमेद ची टीम तालुका अभियान व्यवस्थापक संदीप कापसे तालुका व्यवस्थापक शरद पाटील तालुका व्यवस्थापक नवनाथ पवार प्रभाग समन्वयक रवींद्र सहाने, सचिन देवकर,काशिनाथ पंडित, नसीम शेख,सागर कुसुंबे, संदीप बोके, प्रवीण लोखंडे व राजेंद्र भोपळे यांनी पुढाकार घेऊन सर्व कामगिरी पार पाडली.

गट विकास अधिकारी रत्नाकर पगार यांनी सांगितले की गणपती मूर्ती विक्री मधून बऱ्याचशा महिलांचे आर्थिक सक्षमीकरण खूप चांगल्या प्रकारे झालेली आहे व त्याचप्रमाणे त्यांना लखपती होण्यास मदत मिळाली आहे.

## भाविकांना कंटेनरने चिरडले :चार जणांचा मृत्यू!

**बीड जिल्हा प्रतिनिधी :**
**मारुती सत्रे**
बीड – धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील बीड तालुक्यातील नामलगाव फाटा येथील उड्डाणपुलाजवळ शनिवारी (दि.३०) सकाळी साडेसातच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात चौघांचा जागीच मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनरने सहा जणांना चिरडले. यात चौघांचा जागीच मृत्यू झाला तर दोघे गंभीर जखमी असून त्यांना तातडीने बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघातातील जखमी व मयत हे पेंडगाव येथे दर्शनासाठी जात असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.



सोलापूर धुळे महामार्गांवर काही दिवसापूर्वी गढी नजिक सहा तरुणांना भरधावं वाहणाने चिरडले होते. या महामार्गांवर मोठ्या प्रमाणात ब्लॅक स्पॉट अर्थात अपघात प्रवण स्थळ आहेत, मात्र प्रशासनाकडून त्यावर कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# ॲड.नरसिंह जाधव यांच्या वतीने पाटोदा वकील संघाला कायद्यांच्या पुस्तकांचा संच भेट...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)-**
पाटोद्याचे भूमिपुत्र व छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात कार्यरत असणारे ज्येष्ठ विधीज्ञ अड.नरसिंह जाधव यांच्या वतीने शुक्रवार रोजी पाटोदा वकील संघाला कायदेविषयक माहिती पुस्तकाचा संच भेट देण्यात आला. एडवोकेट नरसिंह जाधव हे पाटोद्याचे भूमिपुत्र असून सध्या छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात कार्यरत आहेत. पाटोदा न्यायालयात कार्यरत असणाऱ्या वकील बांधवांसाठी त्याच प्रमाणे ज्युनिअर वकील बांधवांसाठी अत्यावश्यक असणारे विविध प्रकारच्या कायद्याची माहिती पुस्तकांचा संच जाधव यांच्या वतीने पाटोदा वकील संघाला भेट देण्यात आला या मध्ये महिलांविषयी कायदे, भारतीय साक्ष अधिनियम 2023, शस्त्रास्त्र कायदा, अमली पदार्थ बंदी विरोधी कायदा, महाराष्ट्र गाव पंचायत कायदा, महाराष्ट्र महानगरपालिका, नगर पंचायत औद्योगिक कायदे, वक्फ बोर्ड कायदा, भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरी सुरक्षा संहिता 2023, विवाह



कायदा1954, मुस्लिम कायदा, हिंदू वारसा हक्क कायदा 1956, बाल लंगिक अत्याचार विरोधी कायदा, डी.व्ही.कायदे, भूसंपादन कायदे विषयक माहिती पुस्तक, त्याच प्रमाणे अत्यावश्यक असणाऱ्या सर्व कायद्यान विषयी माहितीची पुस्तकांचा मोठा संच अँड. नरसिंह जाधव यांच्या वतीने पाटोदा वकील संघाला भेट देण्यात आला. या वेळी पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष अँड.बी.आर.लवुळ, अँड.सुशील कोठेकर, उपाध्यक्ष अँड.जब्बार पठाण, ज्येष्ठ विधीज्ञ अड.एम.व्ही. जाधव, अँड.सय्यद आशरफ, अँड.चंदन कांकरिया, अँड.ऋषिकेश डबीर, अँड.सचिन जावळे, अँड.पूनम शहाणे, एडवोट तळेकर, अँड. आर.एस.घुले अँड.कोल्हे, अँड.सुधीर घुमरे, अँड.जगदाळे, अड.महेश बेदरे यांच्या सह वकील संघाचे सदस्य वकील बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# माणगाव तालुक्यात शिवसेनेत इनकमिंग सुरूच पेण तर्फे तळे ग्रामस्थांचा ना. भरतशेठ गोगावले यांच्या उपस्थितीत शिवसेनेत पक्ष प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सचिन पवार माणगांव रायगड**
**माणगाव -** श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघ माणगाव तालुक्यात शिवसेना पक्षात जोरदार इनकमिंग सुरूच आहे. विवीध पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ना. भरतशेठ गोगावले यांची कार्यप्रणाली पाहून शिवसेना पक्षात प्रवेश करीत आहेत. पेण तर्फे तळे येथील ग्रामस्थांनी दि. २९, ऑगस्ट रोजी ना. भरतशेठ गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक ज्ञानदेव पोवार, युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे, तालुकाप्रमुख अड. महेंद्र मानकर आदी उपस्थित होते.



प्रवेश कर्ते _यावेळी अरुण पेणकर, राम वडेकर, विकास मोंडे, दत्ताराम पेणकर, अनंत वडेकर, धोंडू आरसे, उमाजी ताम्हणकर, चंद्रकांत पेणकर, सुरेश पेणकर, मोहन पेणकर, संदिप पेणकर, सुभाष पेणकर, अनिल पेणकर, राजेंद्र पेणकर, सिताराम पेणकर, नरेंद्र पेणकर, सुनील पेणकर, गणेश पेणकर, पांडुरंग पेणकर, रोहन पेणकर, राजू पेणकर, राजे वडेकर, जानु वडेकर, शैलेश वडेकर, यशु पेणकर, आर्यन पेणकर, गणेश पेणकर यांच्या सह शेकडो पेण तर्फे तळे ग्रामस्थांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला. आगामी येणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकींच्या दृष्टीने पेण तर्फे तळे ग्रामस्थांचा पक्ष प्रवेश महत्वाचा ठरणार आहे. तळाशेत जिल्हा परिषद गणात शिवसेना पक्ष पूर्ण ताकदीने निवडणूक लढवेल व जिंकेल ही. ना. भरतशेठ गोगावले यांच्या माध्यमातून अनेक विकासकामे जलदगतीने होत आहेत. त्यामुळे शिवसेना पक्षावर जनतेचा विश्वास वाढला आहे, असे यावेळी तालुकाप्रमुख अड. महेंद्र मानकर यांनी सांगितले.

# क्षितिज जांभुळकर यांनी घातली मुख्याधिकारी पदाला गवसणी

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**



**भंडारा-** माणसाने ध्येयाचा अंतिम टप्पा गाठल्यानंतर इतका आनंद होतो की आभाळ दोन हात राहिल्यासारखा भास होतो अशीच घटना जांभूळकर परिवारात घडली . क्षितिज ममता ग्यानचंद जांभुळकर खोकरला जिल्हा भंडारा यांनी 2023 मध्ये संपन्न झालेल्या एमपीएससीच्या परीक्षेत यश गाठले व मुख्याधिकारी या पदाला त्यांनी गवसणी घातली. क्षितिज जांभूळकर यांनी आपले प्राथमिक शिक्षण मराठी माध्यमातून पूर्ण केले आहे. माध्यमिक शालेय जीवनापासून त्यांच्या मनामध्ये जिद्द होती की मी मोठा अधिकारी होणारच ती त्यांची जिद्द वर्धा या ठिकाणी मुख्याधिकारी या पदावर नियुक्तीमुळे पूर्ण झालेली आहे . त्यांचे शिक्षण बीएससी गणित मध्ये झालेले आहे.त्यांनी आत्तापर्यंत सहा स्पर्धा परीक्षा पूर्णपणे पास केलेले आहे. सहापैकी ब गटाची मुख्याधिकारी ही नोकरी त्यांनी स्वीकारलेली .आहे मनामध्ये जिद्द असेल तर ह्या जगामध्ये काहीही अशक्य नाही हे क्षितिज यांनी दाखवून दिलेले आहे. सध्या त्या जिल्हा परिषद भंडारा येथे शिक्षण विभाग या ठिकाणी जुनियर असिस्टंट म्हणून कार्यरत होत्या.

क्षितिज सेवानिवृत्त जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षक ग्यानचंद ताराचंद जांभूळकर यांच्या कन्या असून ग्यानचंद जांभूळकर हे विविध सामाजिक संघटनांशी जोडलेले असून जशी त्यांनी विद्यार्थ्यांची काळजी घेतलेली आहे तसेच त्यांनी आपल्या मुलांकडे पण दुर्लक्ष केलेले नाही त्यामुळे समाजातील नव युवकांनी यापासून प्रेरणा घ्यावी व आपले ध्येय गाठावे क्षितिज यांच्या निवडीबद्दल विविध सामाजिक संघटनांनी व त्यांच्या मित्रांनी अभिनंदन केलेले आहे

# श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानकडून गणेशोत्सव २०२५ 'निर्माल्याचे' संकलन

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**
डॉक्टर श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे व आदरणीय महाराष्ट्र भूषण पद्मश्री डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि आदरणीय डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली निर्माल्याचे संकलन आणि त्यातून खतनिर्मितीचे महत्त्वपूर्ण कार्य दीड दिवसांच्या गणपती विसर्जन स्थळांवर जसे डोंबिवली पूर्व, पश्चिम,ठाकुर्ली तसेच ग्रामीण विभाग जसे की खोणि, वाकलण डायघर, दहीसर, खिडकाळी या भागात एकूण २० हुन आधीक गणेश विसर्जन स्थळांवर हे कार्य करण्यात आले. यामध्ये १,000 हून अधिक श्री सदस्य सक्रियपणे सहभागी ज़ाले. विसर्जनासाठी आणलेल्या गणेश मूर्तीसोबत असलेल्या निर्माल्याचे या ठिकाणी संकलन केले गेले. प्रतिष्ठानच्या श्री सदस्यानी हे संकलित केलेल्या निर्माल्या मधील दोरा, प्लास्टिक, कागद आणि इतर अनावश्यक वस्तू बाजूला काढल्या आणि फुलांच्या पाकळ्या



वेगळ्या गोणीत भरल्या. येकुण १ टन हुन अधीक पाकळ्यांच संखलन करण्यात आले. तसेच जमा केलेल्या पाकळ्या उंबार्ली येथे नेऊन त्यापासून गांडूळ खत तयार केले जाते. हे खत उंबारली व इतर ठिकाणी प्रतिष्ठानतर्फे लावलेल्या वृक्षांना पुरवले जाते. आजपर्यंत, डोंबिवली आणि ठाकुर्ली भागात प्रतिष्ठानने ५,000 पेक्षा जास्त वृक्षांची लागवड केलेली आहे आणि ५ टनपेक्षा अधिक गांडूळ खत तयार केले आहे. तसेच डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक समाजोपयोगी कार्य करत आहे. जसे बैठकीच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन, बालसंस्कार मार्गदर्शन, जल पुनर्भरण, स्वच्छता अभियान आणि विहिरी व तलावांची स्वच्छता, आरोग्य शिबीर, रक्त दान शिबिर यांचा समावेश आहे. या प्रतिष्ठानचे कार्य फक्त भारतातच नाही, तर अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, नॉर्वे, दुबई आणि कतारसारख्या अनेक देशांमध्येही सुरू आहे.

# दहिवली गावातील दिलीप करकरे यांच्या गणेशोत्सवात 'मराठी महिना'चा देखावा ठरला आकर्षणाचा केंद्रबिंदू

**प्रतिनिधी:-सचिन पवार**
**माणगांव रायगड**
**माणगांव :-** माणगाव तालुक्यातील दहिवली गावामध्ये श्री. दिलीप करकरे यांच्या घरी विराजमान झालेल्या गणरायाच्या उत्सवात यंदा 'मराठी महिना' हा देखावा विशेष आकर्षण ठरला. गणेश आराधनेसोबत साकारलेला हा देखावा भक्तांच्या मनाला भावणारा होता. या देखाव्याची सजावट स्वरा & स्वरांश बलून डेकोरेशन यांनी अत्यंत सुंदर आणि सुबक पद्धतीने केली होती. छोटेखानी परंतु कलात्मक रचनेमुळे हा देखावा दर्शनाला आलेल्या सर्व भक्तांच्या मनाचा ठाव घेणारा ठरला. वडिल ह. भ. प. कै. बाबू तुकाराम करकरे यांच्या पश्चात करकरे कुटुंबाने वारकरी परंपरा पुढे चालवली आहे. श्री. दिलीप करकरे, श्री. संदीप करकरे, सौ. मिलन संदीप करकरे, सौ. स्वरा दिलीप करकरे मोठे भाऊ श्री . विनोद करकरे ( पोस्टमन) सौ. अस्मिता विनोद करकरे श्री. संतोष करकरे सौ. योगिता संतोष करकरे नातवंड विद्या, तन्मय, तनिष्का, समीक्षा, दक्ष, अर्णव, स्वरांश तसेच आई श्रीमती जयवंती बाबू करकरे यांच्या सहभागामुळे ही परंपरा अधिक बळकट होत आहे. गणेशोत्सवातील या सुंदर सजावटीसह करकरे कुटुंबाच्या भक्तीमय उत्साहाने गावामध्ये धार्मिक व सांस्कृतिक वातावरण उजळून निघाले आहे. 'स्वच्छ, निर्मल जीवन लाभो आणि परंपरेचा वारसा असाच टिकून राहो', अशी प्रार्थना गणरायाच्या चरणी करण्यात आली.



# उदगीर तालुक्यातील हाळी येथील तिरु नदी एका रात्रीत ओव्हर फ्लो

**दैनिक युवक आधार**
**उदगीर प्रतिनिधी बालाजी तेलंग**
:- हाळी व हांडगुळी गावातील मोठ, मोठे गणपतीचे विसर्जन करायचे कुठे. या चिंतेत असलेल्या गणेश भक्तांसह शेतकरी व जनतेला चिंतामुक्त करण्याचे काम निर्सगाने केले आणि दि. २७ रोजी कोरडी असलेली तिरु नदी दि. २७ रोजी रात्रभर पडलेल्या पावामळे तालुक्यातील मोठ्या नदी पैकी एक नदी असलेल्या हाळी हंडरगुळी येथील तिरु नदी दि. २७ रोजी रात्री ८,९ पर्यंत पाण्याऐवजी जलपर्णीने भरलेली दिसत होती. म्हणुन आगामी उन्हाळ्यात पाणी टंचाई जाणवणार तसेच नदीपात्रात पाणी नसल्या तिरु नदी पडलेल्या मुसळधार पावसामुळे ओसंडून वाहू लागली. व या परिसरात जिकडे, तिकडे चोहिकडे पाणीच पाणी दिसू लागले. दि. २७ रोजी रात्रभर व दि. २८ रोजी दिवसभर पडलेल्या पावसामुळे तिरु नदीसह प्रकल्प ओव्हर फ्लो झाल्या मुळे आगामी उन्हाळ्यात पाण्याची व गणपती विसर्जनाची , प्राण्याच्या पिण्याची समस्या मिटली आहे.

# भजन आणि बैठक नृत्याने भक्तिमय झाले श्रीवर्धन

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**
देवाच्या स्तुतीसाठी आणि नामस्मरणासाठी गायले जाणारे सामूहिक गायन म्हणजे भजन, ज्यात टाळ, मृदंग यांसारख्या वाद्यांचा वापर होतो आणि समुदायाला आध्यात्मिक अनुभव देतो भक्ती भजन आणि आरतींमध्ये आपल्याला शांत आणि प्रसन्नतेच्या स्थितीत आणण्याची अद्वितीय क्षमता आहे, लयबद्ध मंत्र आणि आत्म्याला भिडणारे अभंग ज्यामुळे आरामदायी वातावरण तयार होते, कोकणामध्ये गणपती उत्सवानिमित्त घरोघरी भजन, आरती, पारंपरिक बैठक नृत्य, गोफ नृत्य नाचले जातात आणि त्यामुळे सगळीकडे प्रसन्न आणि भक्तिमय वातावरण झालेले असते, अशाच भजन आणि बैठक नृत्याची श्रीवर्धन मधील टिपलेले काही छायाचित्र






# लोकोपयोगी कामावर कौतूकाची थाप ; लखनभैय्या ठाकूर गौरव पुरस्काराने सन्मानित !

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी. रणजीत ठाकूर**
**रिसोड :** भारतीय जनता पक्षाचे एकनिष्ठ, सक्रिय आणि धडाडीचे कार्यकर्ते, नेते लखनभैय्या ठाकूर यांच्या लोकोपयोगी कार्याची दखल घेत त्यांना नुकतेच 'लोकमत गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. लखनभैय्या ठाकूर हे सामाजिक, शैक्षणिक व शेतकरीहितासाठी सातत्यपूर्ण कार्य करीत आहेत. ते भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष असून, त्यांनी यापूर्वी पक्षातील जिल्हा उपाध्यक्ष, प्रदेश सदस्य, प्रदेश सचिव अशा अनेक जबाबदाऱ्या यशस्वीरित्या सांभाळल्या आहेत. २०१५ मध्ये त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यप्रवणतेवर आधारित 'मी पाहिलेले मुख्यमंत्री' हे पुस्तक लिहून मोठी प्रशंशा मिळवली होती. त्यांच्या कार्यामध्ये रिसोड तालुक्यामध्ये शेतकरी बांधवांच्या हिताकरिता व शेतकरी बांधवांची जीवन सुजलाम सुफलाम होण्याकरिता पैनगंगा नदीवर बॅरेजेस व्हावे जलसंपदा विभागाकडे मागील अनेक वर्षापासून पाठपुरावा सुरू आहे तसेच वाशिम जिल्ह्या मध्ये जलक्रांती व्हावी या उद्देशाने वैनगंगा–पैनगंगा नदी प्रकल्पात वाशिम जिल्ह्याचा समावेश व्हावा यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता महाराष्ट्रातील सोलर योजनांना विदर्भात चालना देण्यासाठी प्रयत्न, तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी केलेले उपक्रम विशेष उल्लेखनीय



आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत तसेच भारतीय जनता पार्टी मार्फत जनकल्याण योजना चा प्रचार व प्रसार जनतेपर्यंत पोहोचण्याची कामे करण्याकरिता ते नेहमीच धडपड करत राहिले आहेत. ओला दुष्काळ असो वा कोरडा दुष्काळ, तसेच शेतकरी बांधवांना शेतकरी पीक कर्ज तात्काळ भेटायला पाहिजे तसेच, शेतकऱ्यांच्या कल्याणाची रोजगार हमी योजना अंतर्गत असलेली विहीर सिंचन योजने मध्ये वाढ व्हावी या करिता पालकमंत्री सह रोजगार हमी योजना म्हणतील मंत्री कडे पाठपुरावा करणे ,शेतकरी बांधवांना पिक विमा मिळण्याकरिता प्रयत्न असो किंवा शेतकऱ्यांना २४ तास वीज मिळावी, त्यांना शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा यासाठी त्यांनी मुख्यमंत्री आणि संबंधित मंत्र्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला. 'लोकमत गौरव पुरस्कार' सोहळ्यात उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणातून लखन ठाकूर यांचे योगदान अधोरेखित करत, त्यांच्या कार्याचा गौरव व्यक्त केला. लोकमत गौरव पुरस्कार लोकमत गौरव पुरस्कार कार्यक्रमांमध्ये रिसोड मालेगाव मतदार संघाचे आमदार अमितजी झनक आमदार चैनसुख संचेती आमदार मनोज कांयदे अकोला जिल्हाअधिकारी वर्षा मीना मॅडम अकोला पोलीस अधीक्षक अर्चित जी चांडक मराठी सिने अभिनेत्री ऋतुजा बागवे सह लोकमत युनिट चे मुख्य आलोक शर्मा लोकमत समाचार चे मुख्य प्रभारी अरुण जी सिन्हा सह बुलढाणा व वाशिम जिल्हा लोकमत पत्रकार बांधव वार्ताहर व लोकमत पुरस्कार्थी तसेच लखनसिंह ठाकुर यांच्या परिवारातील त्यांच्या सहचरणी सौ, मेघा ठाकूर कु मीनल ठाकूर दर्शन ठाकूर सह मित्र मंडळी हजर होते

## गौरी गणेश मुर्ती ..

गणपती मुर्ती घडवी
लाखलाख मुर्तीकार
हिंदु मुस्लिम ईसाई
सकल जातकामगार

भेद भाव न गणेशां
फक्त हवे कारीगार
उत्सवा मुळे मिळतो
गरीब घरास आधार

मुर्ती बनता बनवता
जीवना देतो आकार
मुर्ती भासते जीवंत
आपले मनी विकार

पोटभरून जेवतात
ते असंख्य कलाकार
ईश्वर असे कनवाळू
सर्वां प्रदान रोजगार

उत्साह असा उत्सवा
भरतो नवीन हुंकार
भेदा भेद हे जळावे
मिळो सर्वां अधिकार

गजानन सोबत गौरी
परंपरेतला चमत्कार
नर नारी समान मान
दोघांना समनमस्कार

**- हेमंत मुसरीफ पुणे.**

# शिक्षकाची बदली थांबवण्याची मागणी: न थांबवल्यास विद्यार्थ्यासह मुख्यकार्यकारी अधिकारी कार्यालया समोर उपोषण करणार

**दैनिक युवक आधार**
**किनवट प्रतिनिधी**
**विशाल भालेराव**
किनवट तालुक्यातील इस्लापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक इर्शाद इब्राहिम पांडे , यांची नुकतीच बदली देवाची वाडी , येथे झाल्याने इस्लापूर येथील गावकरी तसेच शाळा व्यवस्थापनचे पदाधिकारी यांनी सदरील शिक्षकाची बदली थांबवावी अशी मागणी मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड , यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे .
सविस्तर वृत्त असे की इस्लापूर सावरकरनगर येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक पांडे , यांची बदली देवाची वडी , ता . कंधार 'येथे झाली असून यांची बदली थांबवणे कारण गेल्या दोन वर्षापासून येथील विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेच्या स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर यश मिळवून दिले व शाळेची पटसंख्या दुपटीने वाढ केली तसेच शाळेची गुणवत्ता पाहता लोकसभागातून शाळेचा कायापालट केला इंग्रजी माध्यमातून मुलाचे मराठी शाळेत प्रवेश केले . सदरील शिक्षकाने जिल्हा परिषद शाळेविषयी लोकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन विकसित केला आहे . तरी या शिक्षकांमुळे येथील शाळेची गुणवत्ता सुद्धा चांगली आहे . सदरील शिक्षकाची बदली झाल्यास विद्यार्थ्यांचे व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे अतोनात नुकसान होईल . सदरील शिक्षकाची बदली न थांबवल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात सदरील शिक्षकासाठी पालक व विद्यार्थ्यासह उपोषण करू असा ईशारा येथील माजी सरपंच सूर्यकांत बोधनकर ' पालक जगदीप हानवते , गौरव कदम , राम लंगोटे ,आदी पालकांनी निवेदनाद्वारे दिला आहे .



सदरील शिक्षक यांची कपल मध्ये कंधार तालुक्यात बदली झाली आहे .त्यांच्या पत्नीसह त्या दोघांची बदली किनवट तालुक्यामध्ये व्हावी असेही निवेदनात मागणी आहे .

# हर्षवर्धन सपकाळ - महाराष्ट्र काँग्रेस च्या नव्या प्रवासाचे शिल्पकार

**लेखक : अजय पांडुरंग कापरे**
**(काँग्रेस पक्षाचा एक सर्व सामान्य कार्यकर्ता )**

गेली 11 वर्ष भारतीय जन मनावर मोदी प्रणित भाजप रुपी गारूड स्वार आहे . एक प्रकारे पाशवी सत्ता या देशावर लादली गेली आहे . अनेक राजकीय पक्ष विखुरले गेले आहेत . अनेक दशके भारतीय जनतेच्या मनावर राज्य करणारा काँग्रेस पक्ष आपल्या सर्वात मोठ्या खडतर प्रवासातून जात आहे . किती तरी राज्यात जनतेने निवडून दिलेली सरकार .भाजप ने शासकीय यंत्रणेचा गैरवापर करून ,आणि पक्ष फोडून पडले आहेत . निवडणूक आयोगाच्या सहकार्याने मत चोरी करून सरकार बनवले आहेत . विरोधी पक्षातील नेत्यांचे राजकीय आणि मानसिक खच्चीकरण केले जात आहे .या परिस्थिती मध्ये काँग्रेस पक्ष श्री मलिकार्जुन खरगे यांच्या अध्यक्षतेखाली आणि जननायक राहुल गांधी यांच्या खंबीर नेतृत्वात आपल्या सच्चा सहकार्यांना आणि सामान्य जनतेला सोबत घेऊ सक्षमपणे लढा देत आहे .

देशातील सर्वात महत्वाचे राज्य म्हणजे महाराष्ट्र या राज्यावर जगाचे लक्ष असते . शिव, फुले शाहू आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारधारेवर चालणारे राज्य म्हणजे महाराष्ट्र . या महाराष्ट्राने काँग्रेस पक्षाला आजपर्यंत भरभरून साथ दिली आहे . देशातील आजच्या या संकटाच्या घडीला महाराष्ट्रातून काँग्रेस पक्षाला , सर्वसामान्य जनतेला आपलंसं वाटणार एक खंबीर नेतृत्व हर्षवर्धन सपकाळ साहेब यांच्या मुळे मिळाले आहे . संत गाडगे महाराज ,महात्मा गांधी यांच्या विचारांचे अनुयायी स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांच्या जन्म भूमीतील नेतृत्व म्हणून हर्षवर्धन सपकाळ साहेब यांची ओळख आहे . प्रदेश अध्यक्ष पदाचा पदभार घेतल्यापासून .त्यांनी पूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला आहे .आंदोलन ,मोर्चे , आणि पदाधिकारी मार्गदर्शन शिबिरांच्या माध्यमातून . काँग्रेस पक्षाला एक नवचैतन्य दिले आहे .सामान्य कार्यकर्त्यांमध्ये एक उत्साहाचे वातावरण आहे . सर्वसामान्य घरातील तरुण वर्ग काँग्रेस पक्षासोबत येत आहेत . NSUI आणि युवक काँग्रेस ला नवे नेतृत्व देऊन एक बळकटी दिली आहे . पदाधिकारी मार्गदर्शन कार्यशाळेच्या निमित्त त्यांनी स्वतः हातात झाडू घेऊन टिळक भवन येथे स्वच्छता मोहीम राबवली . ग्रामीण भागातून आलेल्या कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यां सोबतच त्यांनी टिळक भवनातील हॉलमध्ये मुक्काम केला. त्यांचा हा साधेपणा सर्वांना आकर्षित करत आहे . मास लीडर म्हणून त्यांची महाराष्ट्रात ओळख निर्माण होत आहे . विरोधकांच्या प्रत्येक प्रश्नाला ते सडेतोड उत्तर देत आहेत . काँग्रेस पक्षाचे तत्त्व आणि विचारधारा यावर ते ठाम आहेत .

**परिचय**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन वसंतराव सपकाळ राष्ट्रपिता महात्मा गांधी, संत तुकडोजी महाराज आणि गाडगेबाबा यांच्या विचारांनी प्रेरित होऊन राजकारणात उतरलेले सपकाळ आज काँग्रेसच्या नव्या नेतृत्वाचा चेहरा आहेत. त्यांच्या कारकीर्दीचा मागोवा घेताना आणि आगामी आव्हाने समजून घेताना, हा वाढदिवस त्यांच्यासाठी केवळ उत्सव नसून महाराष्ट्र काँग्रेससाठी नव्या दिशेचा निर्धार ठरत आहे.

**जीवन आणि कारकीर्दीची झलक**

शेतकरी कुटुंबातून आलेले सपकाळ हे संत गाडगेबाबा विद्यापीठाचे बि.कॉम. आणि बी.पी.एड. पदवीधर.

विद्यार्थी जीवनात NSUI मधून राजकारणाची सुरुवात.

फक्त २७ व्या वर्षी बुलढाणा जिल्हा परिषद अध्यक्ष बनले आणि त्यांच्या कार्यकाळात जिल्हा परिषद महाराष्ट्रात अव्वल ठरली.

2014 ते 2019 या काळात बुलढाणा विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणून काम.

युवक काँग्रेस, पंचायत राज संगठन तसेच काँग्रेसच्या राष्ट्रीय स्तरावरील जबाबदाऱ्या सांभाळल्यानंतर फेब्रुवारी २०२५ मध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्षपदाची सूत्रे त्यांच्या हातात आली.

**राजकीय भूमिका आणि कामगिरी**

शेतकऱ्यांचा आवाज – शेतकऱ्यांना 'वेट ड्राऊट' जाहीर करून प्रति हेक्टर ₹५०,००० मदत देण्याची मागणी.

युवा संघटनाची उभारणी – युवक काँग्रेसला महाराष्ट्रातील प्रत्येक मतदारसंघात मजबूत करण्याचा निर्धार.

लोकशाहीचे रक्षण – खासगी सुरक्षाबंधन कायद्याविरोधात उद्धव ठाकरे व शरद पवारांसोबत ठाम भूमिका.

*काँग्रेस महाराष्ट्रात सध्या पुनर्बांधणीच्या टप्प्यात आहे. अशा वेळी हर्षवर्धन सपकाळ यांच्यासमोर अनेक मोठी आव्हाने उभी आहेत :*

**1. संघटन बळकट करणे**

ग्रामीण व शहरी स्तरावर काँग्रेसचे कार्यकर्ते एकत्र आणणे, नाराज नेत्यांना सांभाळणे आणि तरुण नेतृत्वाला संधी देणे.

**2. युवकांना आकर्षित करणे**

भाजप-शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांच्या तुलनेत युवकांना काँग्रेसकडे वळवणे हे मोठे आव्हान असेल.

**3. शेतकरी व ग्रामीण मतदारांशी जोडणी**

सध्याच्या हवामान बदल, दुष्काळ, ओला दुष्काळ या प्रश्नांवर ठोस धोरण आणून शेतकऱ्यांचा विश्वास जिंकणे.

**4. आगामी निवडणुका**

महाविकास आघाडी टिकवून ठेवणे की स्वतंत्र लढणे, हा निर्णय महत्त्वाचा ठरेल. या पार्श्वभूमीवर विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका हे मोठे कसोटीचे मैदान ठरेल.

**5. पक्षातील गटबाजीवर नियंत्रण**

काँग्रेसमध्ये पारंपरिक नेत्यांचे गट वेगळे आहेत. त्यांना एकत्र ठेवून एकसंध नेतृत्व उभारणे ही त्यांची खरी परिक्षा असेल.

हर्षवर्धन सपकाळ यांचा वाढदिवस हा केवळ शुभेच्छांचा दिवस नाही, तर महाराष्ट्र काँग्रेससाठी नव्या दिशेचा आरंभ आहे. त्यांच्या गांधीवादी विचारसरणी, जमिनीशी घट्ट नातं आणि संघटनात्मक अनुभवामुळे पक्षाला नवसंजीवनी मिळेल, अशी अपेक्षा काँग्रेस कार्यकर्त्यांना आहे. पुढील काही महिने त्यांच्यासाठी कसोटीचा काळ असेल, परंतु त्यांच्या नेतृत्वातून काँग्रेसला नवा उत्साह आणि लढाऊ बाणा मिळेल, यात शंका नाही.



# जनावरांना क्रूर वागणूक व अवैध वाहतूक करणाऱ्यांवर कार्यवाही

## एकूण 23 लाख 80 हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त



**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा -** जवाहर नगर पोलिसांनी दिनांक 30 ऑगस्ट 2025 रोजी पहाटे 4.30 मौजा कोंढी गावाजवळ आरोपी नामे आसिक मनहरण जोशी वय 24 राहणार भिलाई तालुका धमदा जिल्हा दुर्ग राहणार छत्तीसगड ,,मालक रोशनलाल रामस्वरूप डहेरीया वय 33 वर्षे राहणार पठारा तालुका धमदा जिल्हा दुर्ग राहणार छत्तीसगढ ,त्यांच्या ताब्यातील तपकिरी रंगाचे आयशर कंपनीचे वाहन क्रमांक CG 07CX 3833 किंमत 20,00000/रुपयाचे वाहनाचे डाल्यात काळे, पांढरे व लालसर रंगाचे एकूण 38 गोवंश जातीचे जनावर किंमत 3,80000/ रुपयाचे जनावरे हे त्यांना वाहतूक करणे करिता प्रत्येकी जनावरास 2X2 मीटर जागा असणे बंधनकारक असताना सुद्धा त्यांनी आपले वाहनाचे डाल्यात पुरेशी जागा उपलब्ध नसताना जनावरे निर्दयतेने ,दाटीवाटीने कोंबून कत्तलीसाठी अपुऱ्या जागेत जनावरांना त्रास होईल असल्या स्थितीत तहानेने व्याकुळ झालेले अन्नपाणी निवाऱ्याची सोय न करता क्रूरतेने वागणूक देऊन त्या वाहतूक करताना मिळून आले असून त्यातील 4 जनावरे हे मृत पावले आहेत. असे फिर्यादीचे लेखी तक्रारीवरून आरोपी विरुद्ध 314/2025 अन्वये महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा कलम 5,5(अ)5(बंद)9 आणि प्राणी कृतीने वागविण्यापासून प्रतिबंधक अधिनियम कलम 11(1)(घ)(च)(ड)(ज)(झ )तसेच भारतीय दंड संहिता कलम 325 अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला .सदरची कार्यवाही पोलिस अधीक्षक नुरुल हसन, अप्पर पोलीस अधीक्षक निलेश मोरे ,पोलीस निरीक्षक पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक चुटे ,सहाय्यक फौजदार गोंडाने ,पोलीस हवालदार सपाटे, पोलीस शिपाई नारनवरे पोलीस स्टेशन जवाहर नगर यांनी केली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दूधकावरा पोलीस स्टेशन जवाहरनगर करीत आहेत.





# सरकारचं शिष्टमंडळ मनोज जरांगेंसमोर गपगार !

## शिंदे समितीला चर्चा करण्याचा अधिकारच नाही ; न्या. शिंदे समितीकडून आलेला राज्य सरकारचा प्रस्ताव जरांगे यांनी फेटाळला

मुंबई / मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आपल्या उपोषणावर ठाम आहेत. त्यांच्याशी चर्चा करायला गेलेल्या राज्य सरकारचं शिष्ट मंडळ रिकाम्या हाती परत आलं आहे. त्यांची चर्चा निष्फळ ठरली आहे. या शिष्ट मंडळात न्यायमूर्ती संदीप शिंदे यांचा समावेश होता. राजधानी मुंबईतील आझाद मैदानात मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मुंबईत मराठा समाजाचं आंदोलन सुरु आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी जरांगे पाटील यांनी केलीय. त्यासाठी, राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो मराठा बांधव मुंबईत पोहोचले असून काहीही झालं तरी आरक्षण घेतल्याशिवाय माघार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतलीय. याचदरम्यान, राज्य सरकारचं शिष्टमंडळ आझाद मैदानात जरांगेंच्या भेटीला गेलं आहे. या शिष्टमंडळात न्यायमूर्ती संदीप शिंदे यांचा समावेश आहे. न्या. शिंदे यांची सरकारच्यावतीने जरांगेंशी चर्चा सुरु आहे. त्यांनी सोबत आणलेल्या नोंदींबाबतही माहिती दिली आहे. २ लाख ३९ हजार प्रमाणपत्र आम्ही मान्य केली आहेत, असंही शिंदे यांनी सांगितलं आहे. परंतु, मनोज जरांगे आपल्या उपोषणावर ठाम आहेत. 'आम्ही आरक्षण घेतल्याशिवाय हटणार नाही' असा आक्रमक पवित्रा त्यांनी घेतला आहे. मराठा आंदोलकांशी चर्चा करण्याचा न्यायमूर्ती शिंदे समितीला कोणताही अधिकार नाही. सरकारला आमच्याबरोबर चर्चा करण्यास तोंड उरले नाही. मराठा आणि कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय तातडीने काढा. हैदराबाद आणि सातारा संस्थांचे गॅझेटिअर लागू करण्याविषयी आणि बलिदान झालेल्या मराठा तरुणांच्या कुटुंबियांना मदतीविषयी कोणतीही तडजोड करणार नाही. असे जाहीर करून शिंदे समितीच्या माध्यमातून आलेला राज्य सरकारचा प्रस्ताव मनोज जरांगे यांनी स्पष्टपणे फेटाळून लावला. मराठा आरक्षणासाठी आझाद मैदानावर सुरू असलेल्या आंदोलकांच्या मागण्यांवर निर्णय घेण्यासाठी मंत्रिमंडळाची उप समिती आणि न्यायमूर्ती शिंदे समितीतील सदस्यांची शनिवारी सकाळी बैठक पार पडली. या बैठकीत झालेल्या चर्चेनंतर सरकारचा प्रस्ताव घेऊन शिंदे समितीने दुपारी तीन वाजता जरांगे पाटील यांची भेट घेतली. पण, मराठा आंदोलकांशी चर्चा करण्याचा न्यायमूर्ती शिंदे समितीला कोणताही अधिकार नाही. मराठा आरक्षण विषयक मंत्रिमंडळ उप समिती किंवा सरकारमधील मंत्र्यांनी थेट चर्चा करण्याची गरज होती. पण, तसे झाले नाही. सरकारला आमच्याबरोबर चर्चा करण्यास तोंड उरले नाही, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी सरकारच्या वतीने शिंदे समितीने मांडलेला प्रस्ताव फेटाळून लावला. तसेच शिंदे समितीने मागील १३ महिन्यांपासून हैदराबाद आणि सातारा संस्थांच्या गॅजेटचा अभ्यास केला आहे, त्यामुळे या बाबत आणखी वेळ देणार नाही, असेही स्पष्टपणे जाहीर केले. हैदराबाद आणि सातारा संस्थांच्या गॅझेटमध्ये कुणबी नोंदी आहेत. त्यामुळे ही दोन्ही गॅझेट तातडीने लागू करावे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील मराठा हा कुणबीच आहे, असे गृहीत धरून उद्यापासून प्रमाणपत्राचे वाटप करावे. मराठा आणि कुणबी एकच असल्याचा शासन निर्णय तातडीने काढा. मुंबई सरकार आणि औंध संस्थांनच्या गॅजेटचा अभ्यास करण्यासाठी समितीला आम्ही आणखी वेळ देण्यास तयार आहोत. समितीने त्याचा अभ्यास करून कुणबी नोंदी शोधाव्यात. पण, मराठा आंदोलनात बलिदान दिलेल्या तरुणांच्या कुटुंबीयांना दहा लाख रुपयांची मदत तातडीने दिली गेली पाहिजे. त्याविषयी कोणतीही तडजोड करणार नाही. तसेच मराठा आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे सरसकट मागे घ्या, त्यासाठी आम्ही कोणतीही तडजोड करणार नाही, अशी स्पष्ट भूमिका मनोज जरांगे यांनी जाहीर केली.

**मराठा आंदोलकांना मारहाण करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना बडतर्फ करा -**
मराठा आंदोलकांना आणि विशेष करून महिला, लहान मुली आणि मुलांना पोलिसांनी विनाकारण मारहाण केली आहे. अशा ५० – ६० पोलिस अधिकारी आणि किमान १०० पोलिस कॉन्स्टेबलला दोषी ठरवून त्यांना तातडीने बडतर्फ करा. या मागणीवर जरांगे पाटील यांनी जोर दिला. मराठा समाजाने कुठल्याही पोलिसांवर हात उचचला नाही. तरीही आमच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत आणि पोलिसांनी ठरवून सामूहिकपणे आमच्यावर हल्ला केला, तरीही पोलिसांना संरक्षण दिले जात आहे, असा आरोप ही जरांगे यांनी केला.

**न्यायमूर्ती शिंदे समितीचा आदर -**
न्यायमूर्ती शिंदे समितीने तब्बल ५८ लाख कुणबी नोंदी उजेडात आणल्या. त्याचा साधारण तीन कोटी मराठा बांधवांना उपयोग झाला आहे, त्यामुळे शिंदे समिती विषयी समाजाला आदर आहे. या आदराचा फायदा घेऊन सरकार शिंदे समितीला आमच्याशी बोलणी करण्यासाठी पाठवत आहे. सरकारला आमच्याशी बोलणी करायला तोंडच राहिले नाही, असेही जरांगे म्हणाले.

# अनुशक्तीनगरात मनसेच्या गणेशोत्सव सजावट स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**. दैनिक युवक आधार**
**मुंबई(शांताराम गुडेकर) :** अनुशक्ती नगर विधानसभा क्षेत्रात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे व घरगुती गणेशोत्सवासाठी सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. सामाजिक प्रबोधन, व्यसनमुक्ती आणि पर्यावरण संवर्धन या विषयांवर आधारित या स्पर्धेमुळे अनुशक्तीनगर विधानसभा क्षेत्रात भक्तिमय वातावरणासोबतच सामाजिक संदेशही दिला जात आहे.

नवनिर्वाचित विभागाध्यक्ष रवींद्र शेलार आणि महिला विभागाध्यक्षा अमिता गोरेगावकर यांनी या उपक्रमाचे नेतृत्व केले असून, राज्य उपाध्यक्ष नवीन भाऊ आचार्य आणि माजी विभागाध्यक्ष रवींद्र गवस यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. उपविभागाध्यक्ष सचिन ससाने, विशाल कदम, राजेश पूर्वे, प्रांजल राणे कस्पटे, लक्ष्मी ताई, विद्यार्थी सेनेचे गजेंद्र कांबळे, योगेश घनदाट, रुपेश बोरकर तसेच शाखाध्यक्ष मंगेश पडवळ, संतोष पवार, मदन गाडेकर, प्रसाद सनगरे, जयेश ठाकूर, संदीप बनसोडे, रोहित शेट्टी आदींनी स्पर्धा यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेतले. गणेशोत्सव हा जातीपातीच्या पलीकडे साजरा केला जाणारा महाराष्ट्राचा प्रमुख सण आहे. “जातीपाती मला न कळते, मला न कळे कोणाचा एवढेच माहीत मी महाराष्ट्राचा, महाराष्ट्र माझा” असे विचार व्यक्त करून विभागाध्यक्ष शेलार यांनी राजसाहेब ठाकरे यांच्या शिकवणीवर प्रकाश टाकला. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासाठी प्रथम पारितोषिक ₹५१,०००, द्वितीय ₹२५,००० तर तृतीय ₹१५,००० ठेवण्यात आले आहे. घरगुती गणेशोत्सवासाठी प्रथम पारितोषिक ₹११,०००, द्वितीय ₹७,००० व तृतीय ₹५,००० अशी बक्षिसे जाहीर करण्यात आली असून सर्व सहभागींना विशेष पारितोषिक देण्यात येणार आहे. या उपक्रमाचे अभिनंदन मनसे नेते अमित ठाकरे, नितीन सरदेसाई, शिरीष सावंत, योगेश सावंत, कर्णबाळा दुनबळे, राजाभाऊ चौगुले, रीठा गुप्ता व स्नेहल जाधव यांनी केले आहे. पारितोषिक वितरण समारंभ घटस्थापनेच्या दिवशी पार पडणार आहे.

